## टायगर श्रॉफ हल्लाप्रकरणी तिन्ही आरोपींना पोलीस कोठडी

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तीन मुख्य आरोपींना



मुंबई न्यायालयाने ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींना राजस्थानातील कोटा येथून मुंबईत आणण्यात आले होते. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये हरियाणातील सोनिपत येथील रेहान उर्फ सुक्का, मूळचा बिहारमधील बेगुसराईचा आणि मुंबईत राहणारा हृतिक कुर्मी उर्फ रोशन आणि हरियाणातील फुल सिंग यांचा समावेश आहे. गुन्हे शाखेने या तिन्ही आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. आरोपींचे वकील अजिंक्य मिर्गल आणि सत्यब्रत जोशी यांनी कोठडीस विरोध केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपींना ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या हल्ल्यात टायगर बचावला, पण त्याचा चालक व एक जण जखमी झाला आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ९५
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २२ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### अंतरंग

पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून गंडा/३
माणगावमध्ये क्षुल्लक वादातून पत्नीला मारहाण/५
हॉलीबॉल स्पर्धेत 'सीकेटी' संघ उपविजेता/८

## बॉलीवूड अभिनेत्यांच्या सुरक्षेत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील जुहू भागात बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर मुंबई पोलीस आणि प्रशासनाने अनेक दिग्गज अभिनेत्यांच्या सुरक्षेत मोठी वाढ केली आहे.

टायगर श्रॉफच्या गाडीवर १८ ऑक्टोबरला जुहू येथे गोळीबार झाला. या हल्ल्यात टायगर बचावला, पण त्याचा चालक व एक जण जखमी झाला आहे. मुंबई पोलिसांच्या संरक्षण शाखेने टायगरला



विशेष पोलीस सुरक्षा आणि अतिरिक्त बॉडीगार्ड्स तैनात केले आहेत.

पोलीस तपासात समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार लॉरेन्स बिश्नोई गँगचे नेमबाज सलमान खानला लक्ष्य करणार होते, पण सलमानच्या घराबाहेरील कडक बंदोबस्तामुळे त्यांनी मोर्चा टायगरकडे वळवला.

या खुलाशानंतर सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेरील सुरक्षा कमालीची वाढवण्यात आली आहे. त्याच्या सुरक्षेत अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह अतिरिक्त कमांडो आणि जवान तैनात करण्यात आले आहेत तसेच त्याच्या घरातील बुलेटप्रूफ काचांचे शील्डही अपग्रेड केले जात आहे. सलमानला आधीच वाय+ श्रेणीची सुरक्षा आहे.

अक्षय कुमारनेही खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या घराची सुरक्षा वाढवली आहे. त्याने आपल्या घराजवळ बुलेटप्रूफ काचा बसवण्यास सुरुवात केली आहे तसेच त्याच्या घराबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अक्षय कुमारकडे एक्स श्रेणीची सुरक्षा आहे.

वांद्रे येथील आमिर खानच्या निवासस्थानाबाहेरही मुंबई पोलिसांकडून खबरदारीचा उपाय म्हणून सुरक्षा वाढवण्यात आली आहे, तर शाहरूख खानकडे आधीपासूनच वाय+ श्रेणीची सुरक्षा असून ताज्या घडामोडींनंतर त्याच्या सुरक्षेबाबतही पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

## सिंहस्थ कुंभमेळ्याचे राष्ट्रपतींना निमंत्रण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाचा शुभारंभ ठरणार्‍या ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अन्य मंत्री आणि अधिकारी-पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना येत्या ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण दिले. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेपासून आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी आणि खाद्यसंस्कृतीपर्यंतच्या वैविध्यपूर्ण वारशाची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही त्यांना प्रदान केला. राष्ट्रपतींना ध्वजारोहणाच्याच दिवशी होणार्‍या गोदा आरती, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कॉफीटेबल बुक आणि टपाल तिकिटाच्या अनावरणासाठीदेखील आमंत्रित करण्यात आले.

### वैविध्यपूर्ण वारसा संच भेट

आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांचा या भेटवस्तू संचात समावेश आहे. अगरबत्ती, भरडधान्यांपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, मोहफुलांपासून बनविलेली उत्पादने, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू आणि वनमध अशा विविध उत्पादनांतून आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान, नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर आणि स्थानिक उद्योजकतेचे सामर्थ्य समोर येते. महाराष्ट्राच्या वस्त्रपरंपरेचा मानबिंदू असलेल्या येवला येथील पैठणीचा या संचात समावेश करण्यात आला आहे. नाशिकच्या कृषिसमृद्धीचे प्रतिनिधित्व काळ्या मनुका आणि काजू या उत्पादनांद्वारे करण्यात आले आहे. खाद्यपरंपरेचे प्रतीक असलेल्या चिवड्याचाही या संचात समावेश आहे.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळामंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्यमंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त न्यायमूर्ती विवेक सोनवणे, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, त्र्यंबकेश्वर पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे नरसिंहकृपा दास, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

राष्ट्रपतींना सादर करण्यात आलेले निमंत्रण वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक संकल्पनेवर आधारित आहे. निमंत्रण पेटी उघडताच कुंभमेळ्याची पौराणिक पार्श्वभूमी, आध्यात्मिक महात्म्य आणि भव्यता दर्शविणारी त्रिमितीय कलाकृती उलगडते. दृष्टी, श्रवण, गंध, चव आणि स्पर्श या पंचेंद्रियांशी संबंधित अनुभवांचा समावेश असलेल्या या संकल्पनेतून नाशिकचा सांस्कृतिक वारसा, पवित्र गोदावरीचा महिमा आणि भारतीय परंपरेतील कुंभमेळ्याचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

## दिवेआगर दुर्घटनेप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथे सहलीसाठी आलेल्या आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला होता. या दुर्घटनेप्रकरणी विनर्स अकॅडमीच्या संस्थापक शिक्षकासह पाच जणांविरुद्ध दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिवेआगर समुद्रकिनारी १ ऑक्टोबरला आळंदी येथील विनर्स अकॅडमीचे विद्यार्थी आणि शिक्षक फिरण्यासाठी आले होते. यावेळी समुद्रात उतरलेल्या तन्मय दत्तात्रय वहिले, सुमित भरत अहिरे, प्रणव रामदास बनसोडे, कैवल्य सतिश वासनकर, राजवीर युवराज वहिले, यश किरण वानखेडे, सोहम तुकाराम भांडवलकर आणि कौस्तुभ संदीप दौंड या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता.

यातील मृत विद्यार्थी राजवीर वहिले याचे वडील युवराज वहिले यांनी दिघी सागरी पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दाखल केली आहे. विनर्स अकॅडमीचे संस्थापक, शिक्षक आणि स्टाफ यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांना दिवेआगर येथे सहलीसाठी आणून बेजबाबदारपणे पोहण्यासाठी समुद्रात पाठविले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची साधने वापरण्यात आली नाहीत, असा आरोप तक्रारदाराने केला आहे.

याप्रकरणी अमर मोतीराम आदक, मृणाल सुरेश नारखेडे, सबा मेहबूब इनामदार, शिल्पा अमर आदक आणि वैष्णवी मृणाल नारखेडे (सर्व रा. आळंदी) यांच्याविरुद्ध दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संतोष आवटी अधिक तपास करीत आहेत.

## पदवीधर, शिक्षक मतदारसंघांतील प्रचारतोफा आज थंडावणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीच्या प्रचाराची मुदत गुरुवारी (दि.२२) संपत आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूर विभागांतील पदवीधर तसेच अमरावती आणि पुणे विभागांतील शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.

पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार रिंगणात असून १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी दोन हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार असून ३१ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. मतदानाची प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. निवडणूक निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज होत आहे.

### निवडक

**गोळीबारात एकाचा मृत्यू; डॉक्टरसह सहा जणांना अटक**

**मीरा-भाईंदर :** ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोडवरील चेना जंगलात रानडुकराची शिकार करताना झाडलेल्या गोळीत मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी विजय सुखरू सापटे (६०, वेलकरी पाडा) यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी बनावट मृत्यू दाखला देणार्‍या डॉक्टर राजेश पालांडेसह सहा जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेत कल्पेश ढगळा आणि कुणाल शेलार हे दोघे जखमी झाले आहेत.

**राष्ट्रीय कला प्रदर्शनात महाराष्ट्राच्या तिघांचा गौरव**

**नवी दिल्ली :** ललित कला अकादमीच्या ६५व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनात महाराष्ट्राच्या तीन कलाकारांनी राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला आहे. रमेश विठ्ठल थोरात, सिद्धार्थ शाहजीराव शिंगाडे आणि प्रितम मधुकर देवसकर यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रतिष्ठित ललित कला अकादमी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोहळ्यास केंद्रीय संस्कृती व पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत, संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल उपस्थित होते.

## पनवेलमध्ये आरएसएसचे पथसंचलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. शिस्त, समर्पण, राष्ट्रभक्ती आणि संघटनशक्तीचा जागर घडवणारे हे पथसंचलन राष्ट्रसेवेच्या दृढ संकल्पाचे प्रतीक ठरले. भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांनीही पथसंचलनात सहभाग घेतला.

या भव्य पथसंचलनाचा प्रारंभ साईनगर येथील श्री साई गणेश मंदिर येथून झाला. गणवेशात सज्ज झालेल्या स्वयंसेवकांनी घोषवाद्यांच्या तालावर शिस्तबद्ध पद्धतीने संचलन केले. यावेळी नगर संघचालक राकेश फाटक हे निरीक्षण अधिकारी म्हणून लाभले. संचलनामध्ये विभाग प्रचारक रवी शेट्टी व पाच जिल्हा कार्यकर्त्यांचा सहभाग होता. घोष प्रमुख म्हणून मधुकर यांनी घोषदंडची जबाबदारी घेतली. नागरिकांनी स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.



## नवी मुंबईमधील तलावात बुडून दोन मुलांचा मृत्यू

**नवी मुंबई : वार्ताहर**

नवरात्रोत्सवानिमित्त देवी आणि घटांच्या विसर्जनावेळी वाशीतील कोपरी गाव तलावात उतरलेल्या दोन बालकांचा तलावात बुडून मृत्यू झाला. गोलू मन्सूरी (१०) आणि गणेश गुप्ता (१२) अशी या मृत बालकांची नावे आहेत.

प्राथमिक माहितीनुसार नवरात्रोत्सवानिमित्त विसर्जनावेळी तलावात वाहिलेले पैसे काढण्यासाठी गोलू आणि गणेश मित्रांसोबत पाण्यात उतरले होते, मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघांचाही तलावात बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्यादरम्यान दोन्ही बालकांचे मृतदेह हाती लागले असून त्यांना वाशी रुग्णालयात पुढील कार्यवाहीसाठी नेण्यात आले.

## प्रभू श्रीरामाच्या जयघोषात रामलीला आणि रावण दहन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजयादशमीनिमित्त पनवेल येथे सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रावण दहन सोहळ्याला शहरवासीयांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत आकर्षक आणि प्रबोधनपर अशा रामलीला सादरीकरणाने झाली.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सर्व नागरिकांना मान्यवरांनी दसर्‍याच्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी रामलीलामध्ये सहभागी झालेल्या कलावंतांनी प्रभू श्रीरामांचे प्रेरणादायी जीवन आणि रावणावर मिळवलेल्या विजयाचे विविध प्रसंग अत्यंत प्रभावीपणे उभे केले. दरम्यान, यावेळी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय सेवेची २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'नमो सेवा गाथा-अनकही कहानियाँ' या विशेष नाट्यप्रयोगाचेही आयोजन करण्यात आले होते.

रामलीला सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण परिसर जय श्रीरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला आणि त्याच उत्साहात रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करण्यात आले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे या रावण दहनानंतर आकाशात करण्यात आलेली नेत्रदीपक फटाक्यांची आतषबाजी ठरली, जी पाहण्यासाठी पनवेल शहर व परिसरातून लहानांपासून मोठ्यांपर्यंत असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका प्रीती जॉर्ज, रूचिता लोंढे, संजय जैन, अभिषेक पटवर्धन, वर्षा ठाकूर, अमोघ ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थिती दर्शवून या सोहळ्याचे साक्षीदार बनले.



## श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास प्रारंभ

### रोह्यात भाविकांची गर्दी; रायगड पोलीस दलाकडून मानवंदना

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत आणि असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्याला बुधवारी (दि.२१) सकाळी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. ब्रिटिश काळापासून चालत आलेल्या परंपरेनुसार श्री धावीर महाराजांना यंदा १६५वी सशस्त्र पोलीस मानवंदना देण्यात आली.



यावेळी पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, विश्वस्त नितीन परब, विजय मोरे आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उत्सवानिमित्त मंदिराचा संपूर्ण परिसर विविधरंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आला. पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळ्यांनी वातावरण प्रसन्न झाले. भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळ्यांच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर महाराजांची पालखी पारंपरिक वाद्यांच्या गजरात मार्गस्थ झाली.

पालखीच्या दर्शनासाठी येणार्‍या भाविकांसाठी जैन संघटना, रोटरी क्लब, प्रकाश जैन आदी विविध सामाजिक मंडळांमार्फत शहरात ठिकठिकाणी थंड पेये, चहा आणि अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. येथील आशीर्वाद मंडळातर्फे भाविकांसाठी गेली अनेक वर्षे सुरू असलेली मोफत भोजन व्यवस्था यंदाही आहे.

# पाणीटंचाई कृती आराखडे सादर करा

## मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील संभाव्य पाणीटंचाईच्या विविध टप्प्यांसाठी वस्तुनिष्ठ व गावनिहाय कृती आराखडे येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत तसेच जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के प्रगती झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करून कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील पाणीपुरवठा योजना, भूजल पातळी आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.



सध्या या विभागांत गंभीर पाणीटंचाई नसली तरी आगामी महिन्यांतील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आणि ग्रामपंचायतींशी चर्चा करून तसेच प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे कृती आराखडे तयार करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. जलजीवन मिशन अंतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांमधील पाइपलाइन, पंप, वीजजोडणी, रोहित्र आदींसंबंधीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. ७५ टयांपेक्षा अधिक प्रगती झालेल्या योजनांची पॅकेजविषयक माहिती पूर्ण करून प्रमाणित करावी, जेणेकरून निधी वितरणात अडथळे येणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

संभाव्य टँकरग्रस्त गावांसाठी जलस्रोत बळकटीकरणाचा स्वतंत्र आराखडा तयार करावा. जिल्हा नियोजन समितीच्या दोन टक्के निधीच्या तरतुदीतून जलस्रोत बळकटीकरणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. विहीर पुनर्भरण, शेततळी, सिमेंट बंधारे, सिमेंट प्लग, सलग समतल चर तसेच जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे करावीत. आवश्यक कामांसाठी जिल्हा नियोजन, खनिज आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीतूनही नियोजन करावे, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.पाणीटंचाई निवारणासाठी टँकरचा वापर हा अंतिम पर्याय असावा. त्यापूर्वी उपलब्ध विहिरींची स्वच्छता व निर्जंतुकीकरण, स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन आणि पाण्याचा काटकसरीने वापर या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. पाणीटंचाईबाबत तक्रार प्राप्त झाल्यास किंवा त्यासंदर्भात बातमी प्रसिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने संबंधित गावाला भेट देऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले. पूर्ण झालेल्या आणि यशस्वी चाचणी घेण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनांचे जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी. स्थानिक संस्थांकडून योजना स्वीकारण्यास विलंब झाल्यास शासनाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करावी. योजनांचे परिचालन, वीजदेयके भरणे आणि देखभाल यांची जबाबदारी जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे पार पाडावी. वीजजोडणी किंवा रोहित्रासंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी समन्वय साधावा, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.

# ‘सीकेटी’त टीबीमुक्त भारत अभियानावर जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात बुधवारी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम व शहर क्षयरोग केंद्र, पनवेल पालिका आरोग्य विभागातर्फे टीबीमुक्त भारत अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता व विद्यार्थ्यांमार्फत जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जे.बी.एस.पी. संस्थेचे शाळा समिती निरीक्षक संतोष चव्हाण, पालिकेच्या आरोग्य विभागाच्या आरोग्य अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, प्रसाद नखाते, मनीषा पुंड व त्यांची टीम, मुख्याध्यापिका स्वाती काळे, एन.सी.सी. ए.एन.ओ. स्नेहा पाटील उपस्थित होते.

प्रसाद नखाते यांनी आयोजनाबाबत माहिती सांगितली तसेच टीबीविषयी लोकांमध्ये असलेली भीती व गैरसमाविषयी माहिती देऊन हा आजार शंभर टक्के बरा होतो, असे सांगितले. विद्यार्थ्यांना टीबीमुक्त भारत अभियानावर आधारित ध्वनिचित्रफीत दाखविण्यात आली. तसेच ‘जोश’ ॲपबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांकडून टीबीमुक्त भारताची शपथ घेण्यात आली. डॉ. रेहाना मुजावर यांनी टीबी दर दहा लोकांमागे दोन लोकांना होऊ शकतो, परंतु योग्य खबरदारी घेतली तर टीबी समूळ नाहीसा होतो, असे सांगून जनजागृतीसाठी एन.सी.सी. कॅडेट्सनी योगदान द्यावे, असे आवाहन केले.

संतोष चव्हाण यांनी टीबीमुक्त अभियान कशा पद्धतीने यशस्वीपणे राबवू शकतो याविषयी माहिती दिली. मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी महापालिकेच्या आरोग्य विभागाचे आभार मानले व आमची शाळा या अभियानासाठी शंभर टक्के योगदान देईल, असे आश्वासन देत एन.सी.सी. कॅडेट्सना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले आणि आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# काळसेकर कॅम्पसमध्ये कॉपीराइट संरक्षणावर मार्गदर्शन सत्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-ए-इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस, न्यू पनवेल येथील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये संस्थेची नवोपक्रम परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी “सर्जनशील कलाकृतींचे संरक्षण कॉपीराइटच्या दृष्टिकोनातून” या विषयावर विशेष तज्ज्ञ मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कॅम्पस संचालक डॉ. रमजान खाटीक व प्राचार्य डॉ. राजेंद्र मगर यांनी पुष्पगुच्छ देत पाहुण्यांचे स्वागत करून केली.

यावेळी डॉ. रमजान खाटीक यांनी विद्यार्थीदशेमध्ये कॉपीराइट व पेटंटचे महत्त्व समजावून सांगितले. प्राचार्य डॉ. राजेंद्र मगर यांनी आपण करत असलेल्या इनोव्हेटिव्ह, क्रिएटिव्ह कामाचे कॉपीराइट किंवा पेटंट का करणे गरजेचे आहे यावर भाष्य केले. सत्रासाठी डॉ. शुभांगी एल. वैकोले, प्राध्यापक व माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख, फादर सी. रॉड्रिग्ज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वाशी या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी कॉपीराइटचे महत्त्व, कॉपीराइट नोंदणी प्रक्रिया, निर्मात्यांचे अधिकार, सर्जनशील कार्याच्या संरक्षणाशी संबंधित विविध कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन केले.

कॉपीराइट फाईल करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावी यासाठी तज्ज्ञांनी संगणक अभियांत्रिकी पदव्युत्तर द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी मिझबा शेख हिच्या संशोधनाचा लाइव्ह कॉपीराइट करून दाखविला.

# माथेरानमधील शाळेला डिजिटल क्लासरूमची भेट

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर शाळेत माजी विद्यार्थी तथा माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे विद्यमान नगरसेवक सचिन दाभेकर यांच्या प्रयत्नांतून आणि महाराष्ट्र विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, तसेच नवनीत प्रकाशनचे रिजनल मॅनेजर सचिन जगाठिया, विधानसभा संपर्कप्रमुख अनिल घोणे यांच्या सहकार्याने अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम बनवून देण्यात आला.



विजयादशमीच्या निमित्ताने माथेरानमधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर शाळेत डिजिटल क्लासरूम सुरू करण्यात आला. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना आधुनिक डिजिटल शिक्षण मिळावे यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. माथेरानच्या याच शाळेतील माजी विद्यार्थी तथा नगरसेवक सचिन दाभेकर यांच्या अथक प्रयत्नांतून विधान परिषद उपसभापती, नवनीत प्रकाशनचे सचिन जगाठिया, विधानसभा संपर्कप्रमुख अनिल घोणे यांच्या सहकार्याने अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम शालेय विद्यार्थ्यांना मिळाला आहे. त्यामुळे आता या शाळेतील विद्यार्थी स्मार्ट शिक्षण पद्धतीने शिकणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ढोले, नगरसेवक सीताराम कुंभार, नगरसेवक किरण पेमारे, नगरसेविका अनिता रांजाणे, अनुसया ढेबे, माजी नगरसेवक प्रसाद सावंत, कुलदीप जाधव, क्षत्रिय मराठा समाज अध्यक्ष गिरीष पवार, माजी शिक्षिका कल्पना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे शिक्षक वाठोरे, विदुला मॅडम आणि शाळेच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे उत्तम आयोजन केले.

# तळा तालुक्यावर दुष्काळाचे सावट; भातशेती सुकली

**तळा : प्रतिनिधी**

यंदा पावसाचे अनियमित प्रमाण व ऑक्टोबर महिना सुरू झाल्यापासून वाढलेला उन्हाळा यामुळे प्रचंड उकाडा, खरीप हंगामातील पिकांची दयनीय अवस्था झाली असून, पाणीटंचाई व दुष्काळाच्या संभाव्य संकटाचा सामना नागरिकांना व शेतकऱ्यांना करावा लागणार आहे. पावसाचे अनियमित प्रमाण आणि खरीप पिकांची दुरवस्था यामुळे तळा तालुक्यात दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे आगमन उशिरा होऊन सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. ऐन हंगामात पावसाने घेतलेली विश्रांती यामुळे पावसातील सातत्य पूर्णपणे खंडित झाले. याचा परिणाम भात, नाचणी, वरी या खरीप पिकांच्या वाढीवर झाला आहे.



अपेक्षित उत्पादन हाती येईल की नाही याबद्दल शेतकऱ्यांमध्ये साशंकता आहे. भातशेती सुकून गेली असून जमिनीला भेगा गेल्याचे चित्र आहे. वन्यप्राण्यांचा उपद्रव आणि आर्थिक संकटाची भीती वाढली आहे. पिकांची घटलेली वाढ यामुळे कणसे वाढली नाहीत आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे शेतकरी आधीच हैराण असताना, रानडुकरे, माकडे आदींसह वन्यप्राण्यांकडून पिकांची मोठी नासधूस केली जात आहे. ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांचा वर्षभराचा उदरनिर्वाह खरीप हंगामावरच अवलंबून असतो. मात्र पिकांचे होणारे नुकसान आणि घटणारे उत्पादन यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता आहे.बदलत्या वातावरणीय परिस्थितीमुळे प्रशासनाने संभाव्य पाणीटंचाईचा त्वरित आढावा घेणे, जलस्रोतांची पाहणी करणे, तसेच वनराई बंधारे बांधण्यास चालना देणे गरजेचे आहे.

पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती गोळा करून योग्य उपाययोजना राबवणे गरजेचे आहे. तालुक्यात पंचनामे करण्याचे काम सुरू झाले आहे. तळा तालुकाही दुष्काळी तालुका म्हणून घोषित करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# सुधागड तालुक्यामध्ये वाढदिवसानिमित्त रोपवाटप

**पाली : प्रतिनिधी**

सध्या वाढदिवस म्हटला की केक कापून आणि अनावश्यक खर्च करून तो साजरा करण्याचा प्रघात पाहायला मिळतो, मात्र याला फाटा देत रायगड जिल्हा परिषदेच्या आदर्श शाळा वाघोशीचे निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त तब्बल ६० रोपांचे वाटप करत संपूर्ण समाजासमोर एक नवा आणि पर्यावरणपूरक आदर्श निर्माण केला आहे.



विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाची जाणीव व्हावी या हेतूने त्यांनी कोलियस, तुती, गवती चहा, सिंगोनियम, लाल ड्रेसिना, जास्वंद व स्पायडर प्लांटसारख्या ६० रोपांची भेट विद्यार्थ्यांना दिली. ही सर्व रोपे त्यांनी स्वतः शाकीय प्रजननाद्वारे तयार केली होती. पर्यावरण रक्षणासोबतच विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात यासाठी त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला हातरुमाल भेट दिला, तर शालेय पोषण आहारात मोतीचूर लाडूचे वाटप करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.

शाळेच्या परिसरात चार औदुंबर व एक पिंपळ अशा पाच महत्त्वपूर्ण वृक्षांची लागवड करून हिरवाईचा संदेश दिला. या स्तुत्य उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेश जाधव, शिक्षकवृंद सुवर्णा घोडे व कीर्ती लामदाडे यांचे विशेष सहकार्य लाभले असून गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे आणि विस्तार अधिकारी नवनाथ साबळे यांच्यासह सर्व स्तरातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# करंजाडेत धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**पनवेल : वार्ताहर**

प्रबुद्ध सामाजिक संस्था, करंजाडे-पनवेल यांच्या वतीने ७०वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमीनिमित्त मंगळवारी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला करंजाडे परिसरातील बौद्ध समाजबांधव, महिला, युवक आणि धम्मभगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी बौद्धाचार्य नितीन मस्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तथागत गौतम बुद्धांचा धम्म आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा सामाजिक परिवर्तन, मानवता आणि समतेची प्रेरणा देणारा ऐतिहासिक दिवस असून डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या धम्मविचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.



# वाशीच्या राजिप शाळेला व्हाईट बोर्ड भेट; दोस्ती ग्रुपचा शैक्षणिक उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील राजिप शाळा वाशी येथील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन शाळेच्या मागणीनुसार दोन व्हाईट बोर्ड सुपूर्द करण्यात आले. लांढर गावचे रहिवासी तथा दोस्ती ग्रुपचे सदस्य जगन शिंदे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच दोस्ती ग्रुपच्या सदस्यांनी विशेष सहकार्य करत शाळेला शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि शाळेतील अध्यापन प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक क्षेत्रासाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी सागर जोगडे, संदेश भगत, जितेंद्र जाधव, संदीप भगत, विकास जोगडे, सहदेव बर्डे, प्रदीप रटाटे, अनूप पडवळ, दैनिक पडवळ, आयुष बामणे, विराज बाकाडे, तेजस लहाने, तुषार लहाने, शाळा समितीच्या अध्यक्षा पूजा जंगम, शाळेच्या शिक्षिका सलगारे मॅडम, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना जितेंद्र जाधव यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांकडे समाजाने गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले.

ते म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक आहे. आर्थिक परिस्थिती किंवा आवश्यक सुविधांच्या अभावामुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये. समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि तरुणांनी पुढाकार घेऊन गरजू शाळांना शैक्षणिक साहित्य, वह्या-पुस्तके, संगणक तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हातभार लावावा. आपण केलेली छोटीशी मदत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देऊ शकते. केवळ मदतीचे आश्वासन न देता प्रत्यक्ष कृतीतून शिक्षणाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देऊया. ग्रामीण भागातील शाळा सक्षम झाल्या तरच गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी मिळतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# पनवेल मनपा महिला, बालकल्याण समितीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची सभा सभापती ममता प्रितम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी महापौर कार्यालयातील बैठक कक्षामध्ये घेण्यात आली. या सभेत महिलांचे सक्षमीकरण आणि मुलांच्या शैक्षणिक प्रगतीशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी दोन विषयांना मंजुरी देण्यात आली.



सभेस महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य तसेच या विभागाच्या उपायुक्त डॉ. रूपाली माने, विभाग प्रमुख कीर्ती महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.सभेत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुलींची शाळेतील गळती रोखणे, त्यांची नियमित उपस्थिती वाढविणे तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने उपस्थिती भत्ता व शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन देणारी योजना सुरू करण्याच्या विषयाला मंजुरी देण्यात आली. या योजनेमुळे मुलींच्या शिक्षणाला चालना मिळणार आहे. तसेच महिला बचत गटांना त्यांच्या व्यवसायाच्या गरजेनुसार शिलाई मशीन, घरघंटी, मिरची कांडप मशीन, भाकरी मशीन, पत्रावळी मशीन व इतर आवश्यक व्यवसाय साधनसामग्री खरेदीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली.

या योजनेतून महिला बचत गटांची व्यवसायक्षमता व उत्पन्न वाढविणे, तसेच महिलांना स्वावलंबी आणि उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहन देता येणार आहे. दरम्यान, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना स्वतंत्र, सुरक्षित व सुलभ व्यायामशाळा आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा तसेच महिलांमध्ये नियमित व्यायाम व क्रीडा सहभाग वाढविण्याचा विषय सविस्तरपणे मांडण्याच्या सूचना सदस्यांकडून करण्यात आल्या. सभेत यापूर्वी झालेल्या बैठकीतील चर्चिलेल्या विषयांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला तसेच ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

# पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष
## पनवेलच्या दाम्पत्याला साडेसात लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पैशांचा पाऊस पाडण्यासह दम्याचा आजार बरा करण्याचे आमिष दाखवून नाशिक येथील कथित भोंदूबाबाने पनवेलच्या दाम्पत्याची सुमारे साडेसात लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी गंगापूर पोलिसांनी अरुण धोंडू पाटील याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे.

पनवेलमध्ये राहणारी तक्रारदार महिला दम्याच्या आजाराने त्रस्त होती. २०२२ मध्ये तिच्या पतीला नाशिकच्या गंगापूर रोड परिसरातील अरुण पाटील हा अघोरी पूजेच्या माध्यमातून आजार बरा करतो, अशी माहिती मिळाली. त्यानंतर दाम्पत्याने त्याची भेट घेतली. कालभैरव पूजा करून आजार बरा करण्यासह पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष त्याने दाखविल्याचा आरोप आहे. या पूजेसाठी त्याने ५० हजार रुपयांची मागणी केली आणि त्यापैकी २५ हजार रुपये आगाऊ घेतले. काही दिवसांनी दोन अनोळखी व्यक्ती दाम्पत्याला नाशिक येथे घेऊन गेल्या.




तेथे महिलेच्या डोळ्यांवर पट्टी बांधून तिला गोदावरी नदीकिनारी नेण्यात आले. यावेळी तिला पांढरे पारदर्शक वस्त्र परिधान करण्यास सांगून अघोरी पूजा करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.यानंतर महिलेची प्रकृती पुन्हा बिघडल्याने दाम्पत्याने अरुण पाटील याच्याशी संपर्क साधला. त्याने पुढील पूजेसाठी दोन लाख रुपयांची मागणी केली. पुन्हा दाम्पत्याला गोदावरी नदीकिनारी नेऊन पूजा करण्यात आली.

बोकडाचा बळी देऊन पुढील विधी केला जाईल, असे सांगून त्यांना घरी पाठविण्यात आले, मात्र पैशांचा पाऊस पडला नाही आणि आजारही बरा झाला नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे दाम्पत्याच्या लक्षात आले. याप्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर गंगापूर पोलिसांनी अरुण धोंडू पाटील याच्याविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते वाहतूक पोलीस चौकीचे लोकार्पण

## पनवेल महानगर प्रेस क्लबची सामाजिक बांधिलकी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रखरखत्या उन्हात, केवळ कर्तव्यभावनेतून रस्त्याच्या मधोमध उभा राहणारा आपला वाहतूक पोलीस. ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता शहराचा गाडा सुरळीत हाकणाऱ्या या वर्दीतील माणसालाही वेदना असतात, त्यालाही दोन क्षण विश्रांतीची गरज असते. हीच माणुसकीची साद ओळखून पनवेल महानगर प्रेस क्लबने सामाजिक बांधिलकी जपत एक अत्यंत स्तुत्य आणि भावनिक उपक्रम राबविला आहे.




वाहतूक नियोजन करताना क्षणभर विसावण्यासाठी सावलीचीही जागा नसलेल्या कर्मचाऱ्यांसाठी पनवेल महानगर प्रेस क्लबने पुढाकार घेत एक संवेदनशील पाऊल उचलले. या प्रयत्नांना पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार आणि म्हात्रे अपघात रुग्णालयाचे डॉ. नितीन म्हात्रे यांची मोलाची साथ लाभली आणि यातूनच पनवेलमध्ये वाहतूक पोलीस निवारा कक्षाची एक हक्काची सावली उभी राहिली. या निवारा कक्षामुळे उन्हाच्या झळा सोसणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या चेहऱ्यावर एक आगळेच समाधान आणि आनंद पाहायला मिळाला.

नुकतेच या निवारा कक्षाचे लोकार्पण पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते दिमाखात संपन्न झाले. या सोहळ्याला नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपआयुक्त डॉ. राहुल खाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त योगेश गावडे, पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, डॉ. नितीन म्हात्रे, गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्यासह माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक गणेश कडू, अजय बहिरा आणि नगरसेविका अस्मिता घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचा संपूर्ण परिवार उपस्थित होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक तुकाराम कदम, सहायक पोलीस निरीक्षक भागवत, सहायक पोलीस उपनिरीक्षक भगवान तायडे, पोलीस हवालदार महेंद्र राजपूत, अमीर मुलाणी, सतिष चौधरी, सागर ढेंबरे, पोलीस नाईक केशव निकम, विश्वनाथ पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सुरेश जंजाळ, महेंद्र गळवे, घरजळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल योगिता पाटील आणि संजय घाडगे यांनी उपस्थित राहून कृतज्ञता व्यक्त केली.

संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, सल्लागार व ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, अनिल भोळे, सहसचिव स्वप्नील दुधारे, खजिनदार सचिन भोळे आणि लालचंद यादव यांनी अथक परिश्रम घेतले. समाजातील प्रत्येक घटकाने पोलिसांप्रति अशीच संवेदनशीलता दाखवली तर त्यांच्याही पाठीवर कौतुकाची आणि विश्रांतीची एक हक्काची थाप नक्कीच पडेल हेच या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे.

# खारघरमध्ये दसरा उत्साहात; गंगा आरती, रावण दहन सोहळ्याला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दसऱ्याचा मंगलमय उत्साह, गंगा आरतीचा भक्तिमय सोहळा आणि रावण दहनाचा रोमांचक क्षण अशा उत्साहपूर्ण वातावरणात खारघरमध्ये दसरा साजरा करण्यात आला. मधू पाटील प्रतिष्ठान आणि प्रवीण स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या वतीने आयोजित या भव्य सोहळ्याला हजारो नागरिकांनी उपस्थिती लावली. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांतील सांस्कृतिक कार्यक्रमांची सांगता दसऱ्याच्या दिवशी या सोहळ्याने झाली.

कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी संपूर्ण उत्सवाच्या आयोजनाचे कौतुक करीत आयोजक मधू पाटील आणि प्रवीण पाटील यांचे अभिनंदन केले. सार्वजनिक उत्सव हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजातील नागरिकांना एकत्र आणणारे आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारे महत्त्वाचे व्यासपीठ असते. याच भावनेतून खारघरमध्ये नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नऊ दिवस विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना सहभागी होण्याची संधी मिळाली.

दसऱ्याच्या दिवशी झालेल्या गंगा आरतीने उत्सवाला आध्यात्मिक वातावरणाची जोड मिळाली, तर रावण दहन सोहळ्याने उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत करण्यात आलेले नियोजन आणि दसऱ्याच्या दिवशी आयोजित केलेला भव्य कार्यक्रम पाहून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मधू पाटील आणि प्रवीण पाटील यांचे कौतुक केले. खारघर आणि परिसरातील नागरिकांना सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम असेच सातत्याने सुरू राहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

हा उत्सव दरवर्षी मोठ्या स्वरूपात आयोजित व्हावा, त्यात अधिकाधिक नागरिकांचा सहभाग वाढावा आणि खारघरच्या सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा मिळावी, असे मतही त्यांनी मांडले. खारघरमधील भव्य मैदानावर पार पडलेल्या कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. कुटुंबीयांसह आलेले नागरिक, तरुणाई आणि लहान मुलांच्या उपस्थितीमुळे मैदानावर उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.







**पनवेल : सामाजिक कार्यकर्ते व भाजप अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष रितेश बाबर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# स्मशानभूमीच्या छतावर चढलेल्या व्यक्तीची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

वरचा ओवळा सेक्टर १ येथील डोंबाळा कॉलेज परिसरातील स्मशानभूमीच्या छतावर चढलेल्या एका व्यक्तीची पनवेल शहर पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. स्मशानभूमीच्या छतावर एक व्यक्ती चढल्याचे निदर्शनास आल्यानंतर नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पनवेल शहर पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

जवानांनी योग्य खबरदारी घेत समन्वयाने बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर संबंधित व्यक्तीला सुरक्षितपणे खाली उतरविण्यात यश आले. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली. बचावकार्य यशस्वी झाल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

# इन्फिनिटी फाउंडेशनकडून सफाई मित्र महिलांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशनच्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त आणि नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्रमांक ७मधील ११ सफाई मित्र महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी स्वच्छ आणि सुंदर शहर घडविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई मित्र महिलांना साडी व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका राजश्री महेंद्र वावेकर आणि दर्शना भोईर उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सफाई मित्र महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेविका राजश्री वावेकर म्हणाल्या की, शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात सफाई मित्रांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत त्या दररोज प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावतात. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. इन्फिनिटी फाउंडेशनने वर्धापन दिनानिमित्त या महिलांचा सन्मान करून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे.

नगरसेविका दर्शना भोईर म्हणाल्या, सफाई मित्र महिला या शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहेत. त्यांच्या मेहनतीमुळे परिसर स्वच्छ राहतो आणि नागरिकांना निरोगी वातावरण मिळते. त्यांच्या कार्याची योग्य दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे ही आनंदाची बाब आहे. इन्फिनिटी फाउंडेशनचा हा उपक्रम समाजात कृतज्ञता आणि सामाजिक जाणीव वाढविणारा आहे.

इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ आकुला म्हणाले की, ११व्या वर्धापन दिनानिमित्त समाजासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याचा आमचा प्रयत्न आहे. सफाई मित्र महिला शहराच्या स्वच्छतेसाठी दररोज मेहनत घेतात. त्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना सन्मानाची भावना देण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला. भविष्यातही सामाजिक बांधिलकी जपत विविध घटकांसाठी असे उपक्रम राबविण्याचा फाउंडेशनचा संकल्प आहे.

# पनवेलमध्ये उपचारादरम्यान अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल :** पनवेलमधील गांधी हॉस्पिटलजवळ बेशुद्धावस्थेत आढळलेल्या ५० ते ५५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. २० ऑक्टोबरला गांधी हॉस्पिटलजवळ एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळली. त्याला उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. मृत व्यक्तीची ओळख पटली नसून कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : सामाजिक कार्यकर्ते व भाजप अनुसूचित जाती मोर्चा उपाध्यक्ष रितेश बाबर यांच्या वतीने आपल्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रेरणेतून मंगळवारी पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी येथील हातावर पोट असलेल्या कामगारांच्या लहान मुलांना खाऊ व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी युवा कार्यकर्ते रमेश शिंदे, समीर शेळके आदी उपस्थित होते.**

संपादकीय

# सामर्थ्यावर मोहोर

भारत हा 'तेलशुद्धीकरणातील महासत्ता' असल्याचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी केलेले विधान म्हणजे भारतीय औद्योगिक क्षमता, तांत्रिक कौशल्य आणि जागतिक ऊर्जा बाजारपेठेतील भारताच्या स्थानाला मिळालेली महत्त्वपूर्ण पावती आहे.

**भारत आता जागतिक घडामोडींचा केवळ प्रेक्षक नाही. तो त्यांना दिशा देण्याची क्षमता असलेला देश आहे, हाच अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्या जामनगर भेटीचा सर्वांत महत्त्वाचा संदेश आहे. जागतिक राजकारणात एखाद्या देशाचे सामर्थ्य केवळ त्याच्या लष्करी शक्तीने किंवा आर्थिक कामगिरीने ठरत नाही, तर जागतिक संकटाच्या काळात तो देश किती निर्णायक भूमिका बजावू शकतो यावरही ते ठरते. रुबिओ यांच्या जामनगर भेटीने भारताच्या वाढत्या सामर्थ्याची अशीच ठळक जाणीव जगाला करून दिली आहे. गुजरातमधील जामनगर येथे रिलायन्स इंडस्ट्रीजचा जगातील सर्वांत मोठा एकाच ठिकाणी असलेला तेलशुद्धीकरण प्रकल्प असून तो भारताच्या औद्योगिक महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे. सौदी अरेबिया, रशिया आणि व्हेनेझुएलासारख्या देशांमधून मिळणाऱ्या विविध प्रकारच्या कच्च्या तेलावर प्रक्रिया करण्याची क्षमता भारतीय रिफायनरींकडे आहे. भारत आता केवळ ऊर्जेचा मोठा ग्राहक राहिलेला नसून, जागतिक पुरवठा व्यवस्थेतील महत्त्वाचा भागीदार बनला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा आणि त्याचे प्रत्यक्ष उपयोगासाठी आवश्यक असलेल्या इंधनात रूपांतर या दोन्ही टप्प्यांमध्ये भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. पश्चिम आशियातील संघर्षामुळे तेथील तेलशुद्धीकरण प्रकल्पांचे नुकसान झाले असून, जागतिक बाजारपेठेत डिझेलसह विविध इंधनांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांवरील अनिश्चिततेमुळे ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. अशा परिस्थितीत भारताची तेलशुद्धीकरणाची प्रचंड क्षमता जागतिक अर्थव्यवस्थेला दिलासा देऊ शकते. जुलैमध्ये भारताने दररोज सुमारे १४ लाख बॅरल शुद्ध पेट्रोलियम उत्पादनांची निर्यात केल्याचे दिसते. रुबिओ यांच्या जामनगर भेटीचा महत्त्वाचा पैलू म्हणजे व्हेनेझुएलातील कच्च्या तेलाच्या शुद्धीकरणाबाबत रिलायन्सशी चर्चा करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. भारताकडे जड कच्च्या तेलावर प्रक्रिया करण्याचे तंत्रज्ञान आणि अनुभव आहे. या क्षमतेचा उपयोग भारतासाठी व्यावसायिक संधी निर्माण करू शकतो, तसेच जागतिक इंधनपुरवठ्यातील अडचणी कमी करण्यासही हातभार लावू शकतो. अर्थात, कोणत्याही व्यवहारात भारताची ऊर्जा सुरक्षा, आर्थिक व्यवहार्यता आणि राष्ट्रीय हित यांनाच प्राधान्य मिळाले पाहिजे. या भेटीला भारत–अमेरिका संबंधांची पार्श्वभूमीही आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि रुबिओ यांच्यात व्यापार, ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील सहकार्यावर चर्चा झाली. भारत–अमेरिका द्विपक्षीय व्यापार करार अंतिम करण्याच्या दिशेने लक्षणीय प्रगती झाल्याचे संकेतही रुबिओ यांनी दिले आहेत. या घडामोडी भारताच्या वाढत्या आर्थिक महत्त्वाच्या निदर्शक आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पायाभूत सुविधांचा विस्तार, उद्योगांना प्रोत्साहन, गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण आणि जागतिक बाजारपेठेशी जोडणी यांवर भर दिला आहे. भारताची औद्योगिक क्षमता जामनगरसारख्या जागतिक दर्जाच्या प्रकल्पांमधून दिसून येते. खासगी उद्योगांची गुंतवणूक, कुशल मनुष्यबळ आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय देशाच्या प्रगतीला गती देत आहे. रुबिओ यांचे 'रिफायनिंग सुपरपॉवर' हे विधान म्हणूनच केवळ कौतुकाचे शब्द नाहीत. ती भारताच्या सामर्थ्याची जागतिक पातळीवर घेतली गेलेली दखल आहे. आत्मनिर्भरतेचा ध्यास आणि जागतिक सहकार्याची तयारी यांची सांगड घालत भारताने ऊर्जा क्षेत्रातील आपले नेतृत्व आता अधिक बळकट करावे.**

# दुष्काळ : महिला व बालविकास विभाग सक्रिय

निसर्गातील बदल, वाढते तापमान आणि पावसाचा अभाव यामुळे राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा परिणाम केवळ शेती आणि अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण भागातील कुटुंबांचे दैनंदिन जीवन, अन्नसुरक्षा, आरोग्य आणि पोषणावरही होतो. विशेषतः लहान बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुली या घटकांवर दुष्काळाचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. या संवेदनशील घटकांच्या पोषण आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दुष्काळी परिस्थितीतही कोणतेही बालक पोषण आहारापासून वंचित राहू नये आणि माता व किशोरवयीन मुलींच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी, यासाठी विभागाची यंत्रणा सक्रिय आहे.

राज्य शासनाने राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला असून, दुष्काळाचा सामना करण्यासाठी विविध विभागांच्या माध्यमातून उपाययोजना करण्यात येत आहेत. या प्रयत्नांमध्ये महिला व बालविकास विभागाची भूमिका महत्वाची आहे. महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माध्यमातून राज्यातील एक लाखापेक्षा अधिक अंगणवाडी केंद्रांद्वारे बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता आणि अन्य पात्र लाभार्थ्यांना पोषण आहार व विविध सेवा पुरविण्यात येतात. राज्यात १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० मदतनीस कार्यरत असून, या यंत्रणेच्या माध्यमातून पोषण, आरोग्य आणि बालसंगोपनविषयक सेवा तळागाळापर्यंत पोहोचविल्या जातात. दुष्काळाच्या काळात या सेवांचे महत्व अधिक वाढते.

**अंगणवाडी केंद्रांमार्फत दिल्या जाणाऱ्या आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नियोजन**

दुष्काळामुळे अन्नधान्य, पाणी आणि इंधनाच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन अंगणवाडी केंद्रांमार्फत दिल्या जाणाऱ्या आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. बालकांना गरम ताजा आहार, घरपोच आहार (टीएचआर) आणि अमृत आहार वेळेत उपलब्ध व्हावा, यासाठी आवश्यक ती दक्षता घेतली जात आहे. जिल्हास्तरीय आहारपुरवठा समित्यांना अन्नधान्याचा साठा, पाण्याची उपलब्धता आणि इंधनाची स्थिती यांचा आढावा घेऊन समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक पातळीवर टंचाई निर्माण झाल्यास लाभार्थ्यांच्या आहारपुरवठ्यात खंड पडू नये, यासाठी आवश्यकतेनुसार आहाराच्या मेनूमध्ये तात्पुरते बदल करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

अंगणवाडी केंद्रांमध्ये आहार शिजविण्यासाठी आणि पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांमध्ये अंगणवाडी केंद्रांना प्राधान्याने पाणी मिळावे, यासाठी ग्रामपंचायत आणि पाणीपुरवठा समित्यांशी समन्वय साधण्यात येत आहे. गरम ताजा आहार तयार करणाऱ्या महिला बचत गटांनाही आवश्यक पाणी आणि इंधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पूर्वनियोजन केले जात आहे. दुष्काळामुळे मूलभूत सुविधांवर ताण निर्माण झाला, तरी बालकांच्या आहारात व्यत्यय येऊ नये, हा या प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे.

**बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांची नियमित आरोग्य तपासणी**

दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि दूषित पाण्यामुळे जुलाब, कावीळ, विषमज्वर तसेच निर्जलीकरणासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. लहान बालके आणि गर्भवती महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने यासंदर्भात काळजी घेणे महत्वाचे ठरते. त्यामुळे आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली पाणी शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर करणे, अंगणवाडी केंद्रांमध्ये ओआरएस पाकिटे आणि झिंकच्या गोळ्यांचा पुरेसा साठा ठेवणे, तसेच पाणी व इंधनाची गंभीर टंचाई असलेल्या केंद्रांची माहिती वेळेत मिळविणे यावर भर देण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या समन्वयाने बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांची नियमित आरोग्य तपासणी करण्यासह आवश्यक औषधे, जीवनसत्त्वे आणि आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

**बालकांच्या वाढीवर आणि पोषणस्थितीवर नियमित लक्ष ठेवले जाणार**

कुपोषणाचे प्रमाण वाढू नये, यासाठी बालकांच्या वाढीवर आणि पोषणस्थितीवर नियमित लक्ष ठेवले जाणार आहे. अंगणवाडी सेविकांमार्फत बालकांची दरमहा उंची आणि वजन मोजून त्याची नोंद पोषण ट्रॅकरमध्ये करण्यात येणार आहे. या नोंदींच्या आधारे पोषणविषयक अडचणी असलेल्या बालकांची ओळख करून त्यांच्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येणार आहेत. तीव्र कुपोषित बालकांना व्हीसीडीसी/यूसीडीसीमार्फत अतिरिक्त ऊर्जा–दाट पोषण आहार उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. गंभीर आरोग्यसमस्या असलेल्या बालकांना पोषण पुनर्वसन केंद्रात दाखल करून आवश्यक उपचार उपलब्ध करून देण्यासाठीही कार्यवाही करण्यात येत आहे. आजारी किंवा कुपोषित बालकांना प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांकडे संदर्भित करून त्यांच्या उपचारांची व्यवस्था केली जाणार आहे.

**कल्याणकारी योजनांचे लाभ पात्र महिलांपर्यंत**

दुष्काळाचा परिणाम केवळ बालकांपुरता मर्यादित नसून गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींच्या पोषणावरही होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या आहारविषयक गरजा, आरोग्य आणि पोषणाबाबत विशेष समुपदेशन सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि अन्य शासकीय कल्याणकारी योजनांचे लाभ पात्र महिलांपर्यंत वेळेत पोहोचतील, यासाठी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. आशा कार्यकर्त्या, एएनएम, अंगणवाडी सेविका तसेच आरोग्य, पाणीपुरवठा आणि महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून स्थानिक गरजांनुसार उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

**स्थलांतरित कुटुंबांतील बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन**

दुष्काळामुळे रोजगाराच्या शोधात ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार आणि अन्य मजुरांच्या कुटुंबांना स्थलांतर करावे लागते. या स्थलांतराचा परिणाम त्यांच्या मुलांच्या शिक्षणासह पोषण आणि आरोग्यसेवांवरही होऊ शकतो. स्थलांतरित कुटुंबांतील बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींना एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात येत आहे. स्थलांतरित लाभार्थ्यांची माहिती स्थलांतर ट्रॅकिंग प्रणालीमध्ये अचूकपणे नोंदविण्यात येणार असून, ऊसतोड हंगामात स्थलांतर करणाऱ्या मजुरांच्या याद्या मिळविण्यासाठी सहकारी संस्था आणि साखर कारखान्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे.

स्थलांतरित कुटुंबे ज्या ठिकाणी वास्तव्यास असतील, त्या परिसरातील ग्रामीण किंवा नागरी अंगणवाडी केंद्रांमार्फत त्यांना पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी आणि अन्य आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे स्थलांतराच्या काळातही बालकांचे पोषण, मातांचे आरोग्य आणि किशोरवयीन मुलींच्या गरजांकडे दुर्लक्ष होणार नाही. शासनाच्या योजनांचा लाभ नियमितपणे मिळत राहण्यासाठी स्थलांतरित लाभार्थ्यांची माहिती आणि स्थानिक यंत्रणांमधील समन्वय महत्वाचा ठरणार आहे.

दुष्काळ ही केवळ पाणीटंचाई किंवा शेतीच्या नुकसानीची समस्या नसून, ती कुटुंबांच्या अन्नसुरक्षा, आरोग्य आणि जीवनमानाशी संबंधित व्यापक समस्या आहे. अशा परिस्थितीत बालके, माता आणि किशोरवयीन मुलींच्या पोषणाची काळजी घेणे ही महत्त्वाची सामाजिक जबाबदारी ठरते. अंगणवाडी यंत्रणेच्या माध्यमातून पोषण आहाराचा नियमित पुरवठा, कुपोषित बालकांसाठी विशेष उपाययोजना, आरोग्य तपासणी, स्वच्छ पाण्याची उपलब्धता आणि स्थलांतरित कुटुंबांना अखंडित सेवा देण्यावर महिला व बालविकास विभागाचा भर आहे. दुष्काळाच्या कठीण परिस्थितीतही संवेदनशील घटकांचे आरोग्य आणि पोषण सुरक्षित राहावे, त्यांचे जीवनमान खालावू नये आणि कोणतेही बालक किंवा माता आवश्यक सेवांपासून वंचित राहू नये, यासाठी विभागामार्फत समन्वयाने प्रयत्न करण्यात येत आहेत.

**शब्दांकन : श्रद्धा मेश्राम,**
विभागीय संपर्क अधिकारी

# साहित्यिक ना. सी. फडके



निमित्त

नारायण सीताराम फडके हे युगप्रवर्तक मराठी कादंबरीकार, कथाकार, मराठी लघुनिबंधाचे आद्य प्रवर्तक आणि साहित्य समीक्षक. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

फडके यांचा जन्म ४ ऑगस्ट १८९४ रोजी नगर जिल्ह्यातील कर्जत या ठिकाणी झाला. त्यांचे वडील सीताराम फडके हे वेदान्ती होते. वेदान्तनिदर्शन (१९१३) हा व्यासंगपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. फडक्यांचे प्राथमिक शिक्षण वडूज (जि. नाशिक), बार्शी (जि. सोलापूर), पुणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी, तर माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजात झाले. १९१७ साली ते एम.ए. झाले. तत्पूर्वीच १९१६मध्ये न्यू पूना कॉलेजात (आजचे स.प. महाविद्यालय) प्राध्यापक झाले.

'मेणाचा ठसा' ही फडके यांची पहिली कथा केरळ कोकिळ मासिकात प्रसिद्ध झाली (१९१२). 'अल्ला हो अकबर!' (१९१७) ही त्यांची पहिली कादंबरी. मारी कोरेली या इंग्रज कादंबरीकर्तीच्या टेंपरल पॉवर या कादंबरीच्या आधारे ती लिहिलेली आहे. त्यानंतर त्यांनी अनेक कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या, मात्र कादंबरीलेखन हे त्यांचे विशेष कर्तृत्वाचे क्षेत्र ठरले. कला ही कलेसाठीच असते वाचकांना सौंदर्यदर्शन घडविणे व आल्हाद देणे हेच कादंबरीकाराचे प्रमुख कार्य या भूमिकेतून त्यांनी प्रमाणबद्ध, आटोपशीर आणि लाघवयुक्त कादंबऱ्यांचे एक युगच मराठीत सुरू केले. 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२) या त्यांच्या आरंभीच्या कादंबऱ्यांतील प्रणयरम्यता, कुशल, सफाईदार व्यक्तिरेखन, चतुर संवाद आणि मोहक भाषाशैली या गुणांनी वाचकांच्या मनांची पकड घेतली.

यानंतरच्या 'उद्धार' (१९३५), 'प्रवासी' (१९३७), 'अखेरचं बंड' (आवृ. दुसरी, १९४४) या महत्त्वाच्या कादंबऱ्यांतून प्रणयरम्यतेला त्यांनी गंभीर विषयांची जोड दिली आणि महाराष्ट्रातील काही असामान्य व्यक्तिमत्त्वांचे दर्शन त्यांतून घडविले. तथापि हे करीत असताना कल्पितालाही त्यांनी वाव दिला आणि ह्या कादंबऱ्या 'चरित्रात्मक' होऊ दिल्या नाहीत. 'बेचाळीसचे पत्रीसरकार' (झंझावात, १९४८), 'काश्मीरचे स्वातंत्र्योत्तर राजकारण' (जेहम, १९४८), 'गोवामुक्तीचे आंदोलन' (उजाडलं! पण सूर्य कुठे आहे? १९५०) अशा काही कादंबऱ्या त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

'ऋतुसंहार' (१९५८), 'कुहू! कुहू!' (१९६०), 'ही का कल्पद्रुमांची फळं?' (१९६१), 'एक होता युवराज' (१९६४) या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्यांपैकी काही होत. त्यांच्या काही कादंबऱ्यांचे आणि कथांचे इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांतून अनुवादही झालेले आहेत. कलंक शोभा (१९३३) या त्यांच्या कादंबरीवरून मराठी चित्रपटही काढण्यात आला होता. फडके यांची तंत्रनिष्ठ कलादृष्टी त्यांच्या कथांतून मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांच्या कथांचे पंचविसांहून अधिक संग्रह प्रकाशित झालेले असून त्यांच्या काही प्रातिनिधिक कथा बावनकशी (१९६२) या नावाने संग्रहित केलेल्या आहेत. अशा या महान साहित्यिकाचे २२ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



बदलते तंत्रज्ञान

## मुलांचा इंटरनेट वापर बंद करणे हा एकमेव उपाय आहे का?

मुलांच्या हातातील मोबाइल काढून घेतला, की इंटरनेटवरचे धोके संपतात का? धोक्यांपासून मुलांना वाचवायचे म्हणून त्यांच्यासाठी ज्ञानाची, माहितीची आणि अभिव्यक्तीची दारेच बंद करायची, हा उपाय कितपत योग्य? सर्वोच्च न्यायालयाने नेमक्या याच प्रश्नाला हात घालत इंटरनेटचा वापर हा मुलांसह प्रत्येकाचाच मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे.



इंटरनेटचा वापर हा प्रत्येक व्यक्तीचा, मुलांचाही मूलभूत अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रश्नावर महत्त्वाची भूमिका मांडली आहे. मुलांना ठरावीक वयापर्यंत इंटरनेट वापरण्यास पूर्णपणे मनाई करणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मग मुलांचे संरक्षण करायचे कसे? हा खरा प्रश्न आहे. इंटरनेटवर अनोळखी व्यक्तींकडून मुलांना संदेश पाठवले जातात. त्यांना आमिष दाखवले जाते. धमकावले जाते. काही वेळा त्यांची वैयक्तिक माहिती किंवा छायाचित्रांचा गैरवापर होतो. अशा वेळी मुलांचा इंटरनेट वापर बंद करणे हा एकमेव उपाय आहे का? की अशा गैरप्रकारांना जबाबदार असलेल्यांवर कारवाई करणे अधिक गरजेचे आहे? न्यायालयाने दुसऱ्या पर्यायावर भर दिला आहे.

मुलांना इंटरनेटवर अमर्याद स्वातंत्र्य असावे, असेही नाही. सोशल मीडिया खात्यांसाठी स्वतंत्र 'चाइल्ड मोड' असावा. अनोळखी प्रौढ व्यक्तींना मुलांशी संपर्क साधणे सहज शक्य होऊ नये. मुलांची खाती सुरुवातीपासून खासगी असावीत. त्यांना दाखवली जाणारी जाहिरात आणि सामग्री वयानुसार नियंत्रित केली जावी. पालकांची संमती, मार्गदर्शन आणि देखरेख यांनाही महत्त्व आहे. अशा उपायांचा विचार न्यायालयाने सुचवला असून, त्यांची अंमलबजावणी कशी करायची याचे तपशील शासनाने ठरवायचे आहेत. मुलांची सुरक्षा महत्त्वाची आहेच, पण त्यासाठी नागरिकांच्या गोपनीयतेला धोका निर्माण होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल.

मुलांना इंटरनेटपासून दूर ठेवणे सोपे आहे, पण त्यामुळे इंटरनेटवरील धोके संपणार नाहीत. त्यासाठी कंपन्यांवर जबाबदारी निश्चित करावी लागेल, हानिकारक सामग्रीवर नियंत्रण आणावे लागेल आणि मुलांना सुरक्षित वापराचे शिक्षण द्यावे लागेल. मुलांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे हा त्यांच्या सुरक्षेचा उपाय असू शकत नाही. इंटरनेट सुरक्षित करण्याची जबाबदारी सोशल मीडिया कंपन्या आणि समाजाची आहे.

आरोग्य प्रहर

## पाठदुखी दूर करण्यासाठी 'हे' पदार्थ बंद करा!

दिवसभराच्या बैठ्या कामांनी अनेकदा पाठ अवघडते. लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर काम असल्याने बसून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. एकाच आसनात बराच वेळ बसल्याने पाठदुखी होते. तुम्हाला जर पाठदुखीची समस्या असेल, तर काही पदार्थांपासून तुम्ही दूर राहणे गरजेचे आहे. हे पदार्थ नेमके कोणते ते जाणून घेऊ...



फिटनेस व पोषण शास्त्रज्ञ आणि फूड दरझीचे सह–संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. ज्यांना पाठदुखीची समस्या आहे त्यांनी साखर, साखरयुक्त सिरप, मका आणि तेल याचा आहारात समावेश करू नये. नैसर्गिक वा प्रक्रिया न केलेला मका हा आरोग्यदायी असला तरी प्रक्रियेदरम्यान त्यातील पोषक तत्त्वे निघून जातात आणि त्याचा आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आहारात मक्याचा समावेश करीत असाल, तर तो प्रक्रिया केलेला नसावा. प्रक्रिया केलेला मका खाल्ल्यानं पाठीच्या खालच्या वेदना वाढू शकतात.

डॉ. सिद्धांत भार्गव यांच्या मते, प्रक्रिया केलेल्या मक्यामुळे इन्सुलिनच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते आणि त्यामुळे जळजळ आणि वजन वाढू शकते. जास्त वजनामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण पडतो आणि पाठीच्या खालच्या भागात दुखणे वाढते. तसेच यामुळे जळजळ बरे होण्याची प्रक्रिया मंद होऊ शकते आणि पाठीच्या खालच्या भागात दुखण्यासारखी परिस्थिती वाढू शकते.

मक्यामध्ये बी जीवनसत्त्व आणि खनिजे तसेच फायबर असते. मध्यम प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्यासाठी हे घटक चांगले असू शकतात. संपूर्ण मक्यामध्ये अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार दाहकविरोधी आहारामुळे पाठदुखी कमी होण्यास मदत होते. भरपूर फळे आणि भाज्या खाणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात.

स्वयंपाक करताना हळद किंवा आले घातल्याने शक्तिशाली दाहकविरोधी फायदेदेखील मिळू शकतात तसेच भरपूर पाणी प्यायल्याने आपले शरीर हायड्रेट राहते.

ताज्या बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी दै. रामप्रहर हक्काचे व्यासपीठ!

# कर्जतमधील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करा -आमदार महेंद्र थोरवे




**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात दुष्काळाची स्थिती असून तालुक्याचे भाताचे कोठार हे बिरुद धोक्यात आले आहे. आम्ही पालकमंत्र्यांकडे दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे, पण शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता शेतीच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याची सूचना प्रशासनाला करण्यात आली आहे, अशी माहिती आमदार महेंद्र थोरवे यांनी दिली. कर्जत प्रशासकीय भवनामध्ये दुष्काळ परिस्थितीबाबत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, सभापती नमिता घारे, उपसभापती चित्रा ठाकरे, नगराध्यक्षा पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सर्व विभागांकडून माहिती घेण्यात आली. कर्जत आणि खालापूर तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात दुष्काळाचे सावट पसरले आहे. सप्टेंबर महिन्यापासूनच पावसाने पाठ फिरवल्यामुळे भाताचे कोठार मानल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यात भाताची पिके पूर्णपणे करपून गेली असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व १५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांच्या पिकांचे शंभर टक्के पंचनामे करावेत, असे स्पष्ट आदेश आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रशासनाला दिले आहेत. या बैठकीत आमदार थोरवे म्हणाले की, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत झालेल्या अपुऱ्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण आणि नुकसानीचे योग्य मूल्यांकन करून बाधित क्षेत्रांचे तातडीने पंचनामे करावेत व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. आगामी काळात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन ज्या गावांमध्ये पाण्याचे स्रोत उपलब्ध नाहीत किंवा पाणीपुरवठ्याच्या पुरेशा सुविधा नाहीत, तेथे पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे.

# माणगावमध्ये क्षुल्लक वादातून पत्नीला मारहाण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील एस. टी. स्टँडसमोरील प्रणव कॉम्प्लेक्स परिसरात कौटुंबिक वादातून पतीने पत्नीला मारहाण करून तिचा मोबाइल फोडल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात २० ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार समीक्षा संतोष साळुंखे (४८, व्यवसाय मोलमजुरी, रा. प्रणव कॉम्प्लेक्स, एस. टी. स्टँडसमोर, माणगाव) यांनी फिर्याद दिली आहे. संतोष गणपत साळुंखे (४८) यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

गुन्हे

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार पती-पत्नीमध्ये घरगुती कारणांवरून वारंवार वाद होत असत. घटनेच्या वेळी पतीने पाणी वापरण्यावरून वाद घातला. फिर्यादीने पाणी आणून वापरण्यास सांगितल्यानंतर आरोपीने शिवीगाळ केली. त्यानंतर भाजी कापण्याच्या सुरीने कपाळावर मारून दुखापत केल्याचा तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यावेळी फिर्यादीचा मोबाइल फोडून नुकसान केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

# तळ्यात नृत्य स्पर्धेतून कलाकारांना व्यासपीठ -मंत्री आदिती तटकरे



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात दरवर्षी नृत्य स्पर्धांचे आयोजन करून मुलांना व्यासपीठ निर्माण करून द्यावे, असे प्रतिपादन युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित नृत्य स्पर्धा कार्यक्रमात बोलताना मंत्री आदिती तटकरे यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष रवींद्र नटे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, सभापती नथुराम मुकण, उपसभापती रवींद्र मांडवकर, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे, युवक अध्यक्ष देवा रामाणे, जि. प. सदस्या नलिनी लोखंडे, माजी सभापती अक्षरा कदम, माजी सभापती नाना भौड, शहर अध्यक्षा मेघा सुतार, पं. स. सदस्या रूपाली तांडेल, स्पर्धेचे परीक्षक चित्रपट कलाकार व टीव्ही मालिका कलाकार सागर खैरे व प्रिया नासकर, पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, विद्यार्थी, पालक, स्पर्धक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहिर नोटीस

मौजे.हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली मिळकत, सदरहू मिळकतीचे गांव नमुना नं.७/१२ चे उता-यांवरील भोगवटादार श्री.नितीन नामदेव भगत व श्री. रोशन कचेर पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे.हरिग्राम,ता.पनवेल,जि.रायगड**

| अ.क्रं. | सर्व्हे/ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| १ | १९/३ | ०-२३-०० | ०.७८ |

सदरहू मिळकतीत वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क-हिससंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिंग, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्ताची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवासांचे आंत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचेकडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. वहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्विवाद व बोजाविरहित आहे आणि वर नमुद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलांचे लाभाती प्रस्तावीत खरेदीखतास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहित धरुन, आमचे अशिल वर नमुद भोगवटादारांबरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणा-या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड.सचिन बी.कोंडीलकर
शॉप नं.१४२, पहिला मजला,
पनवेल म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,
ता.पनवेल,जि.रायगड.

ठिकाण:- पनवेल
ता.२२/१०/२०२६



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## Ramsheth Thakur Public School, Kharghar

CBSE Affiliation No. 1130299 U-DISE 27240806133
Plot No. 11 & 11A, Sector 19, Kharghar, Navi Mumbai 410210
Email Id – rtpskhgr@gmail.com Website – https://www.rtpsk.in

**Applications are invited for the following posts for the Academic Year - 2026-2027 and onward**

**SALIENT FEATURES OF THE SCHOOL**

| | |
|---|---|
| Reputed CBSE Affiliated School | Total 120 Divisions from Nursery to XII Std. |
| Excellent Results | State of the Art Infrastructure and Excellent Learning Resources. |
| School in Two Shifts | Total 4500 Students from Nursery to XII Std. |
| Recipient of District, State, National and International Level Awards in the Academics, Curricular and Extracurricular Activities. | |

| POST | ELIGIBILITY |
|---|---|
| PRINCIPAL (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management)<br>**Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 10 years in Administrative position in CBSE School<br>(Refer CHAPTER-IX of Affiliation Bye-Laws of Minimum Qualifications – PRINCIPAL / HEAD OF THE SCHOOL) |
| VICE-PRINCIPAL (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management)<br>**Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 05 years in Administrative position in CBSE School |
| COORDINATOR (1) | **Qualifications** - Post Graduate with B.Ed. / M.Ed. from recognized university & D.S.M. (Diploma in School Management)<br>**Experience** - 10 to 15 years of Teaching experience including 02 years in Administrative position in CBSE School |

- **Only those candidates who have passed Class X from an English Medium School should apply**
- **Excellent command over the English language.**

**NOTES:-** Candidates should submit their resume, a passport-size photograph and self-attested copies of all relevant documents along with Application.

Application may be sent through Posts addressed to the **Chairman, J.B.S.P. Sanstha's Ramsheth Thakur Public School, Kharghar, Plot No: 11 & 11A, Sector-19, Kharghar, Navi Mumbai, 410210** OR through email to **rtpskhgr@gmail.com**

The last date for the submission of application is **Wednesday, 16/11/2026**

For any query, please contact to **9821537023 / 9870891020 / 9664268045**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
ई-मेल: panvelcorporation@gmail.com
वेबसाईट : panvelcorporation.maharashtra.gov.in

### जाहिर सुचना (शुद्धीपत्रक)

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजासाठी शासकीय / निमशासकीय कार्यालये तसेच महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांची महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः सीबीई १५२५ / प्र.क्र.३७/ आस्थामं (का-१३) दि.१०/०६/२०२५ या शासन निर्णयानुसार करार पद्धतीने नेमणूक करण्याकरिता वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत दिनांक २३/१०/२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर पदांकरिता आयोजित करण्यात आलेल्या थेट मुलाखती रद्द करण्यात येत आहेत. तरी, संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी व सदर मुलाखतीसाठी उपस्थित राहू नये, असे याद्वारे कळविण्यात येत आहे.

दिनांक : २१/१०/२०२६
जा.क्र.:पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.३५३/३७४/२०२६

सही/-
उप आयुक्त (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE

CBSE Affiliation No. 1131483 School Code: 31472
**Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Tal. - Panvel, Dist. - Raigad, Pin - 410206.**
**Contact No. 022-27212067, 77100072762**
**Email: rtpsulwe@gmail.com, Website: www.rtpsulwe.com**

**STAFF RECRUITMENT FOR THE A.Y. 2027-2028**

**Applications are invited for the following positions for immediate appointment for the Academic Year 2027-28**

| Post | Qualification |
|---|---|
| Principal | • Post-Graduate with a minimum of 50% marks<br>• M.Ed. /B.Ed. from NCTE recognized institution with 50% marks.<br>• 10 years of experience in a CBSE school of which 5 years in school administration is preferred |
| Co-ordinator<br>Pre-Primary (1)<br>Primary (1) | • Post-Graduate with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) is mandatory<br>• 5 years of experience in a CBSE school of which 2 years in school administration is preferred |
| TGT<br>English (2)<br>Hindi (2)<br>Marathi (2)<br>Mathematics (2)<br>Science (2)<br>Social Science (2)<br>Computer (1) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) from NCTE recognized institution with 50% marks.<br>• Prior teaching experience in a CBSE school is preferred<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| PRT<br>English (4)<br>Hindi (3)<br>Marathi (3)<br>Mathematics (4)<br>Science (4)<br>Social Science (2)<br>Computer (1) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) from NCTE recognized institution with 50% marks.<br>• Prior teaching experience in a CBSE school is preferred<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| Pre-Primary Teacher (7) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Early Childhood Care and Education (E.C.C.Ed.) is mandatory<br>• Prior teaching experience in a CBSE school is preferred |
| Librarian (1) | • Graduate or Post-Graduate with a minimum of 50% marks<br>• B.LIB / M.LIB is mandatory |
| Art & Craft Teacher (1) | • Graduate or Post-Graduate with a minimum of 50% marks<br>• A.T.D./ B.F.A./ M.F.A./ G.D. Art or Fine Art |
| Music Teacher (1) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Sangeet Visharad mandatory |
| Physical Education Teacher (1) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• B.P.Ed. / M.P.Ed. is mandatory |
| Counsellor (1) | • Clinical Psychologist, R.C.I. Registered |
| Librarian (1) | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• B.LIB / M.LIB is mandatory |
| Accountant (1) | • B.Com / M.Com with a minimum of 50% marks<br>• Tally knowledge mandatory |
| Receptionist (1) | • Graduate or Post-Graduate with a minimum of 50% marks |

- **Candidates must have completed their schooling from an English Medium institution**
- **Excellent command over the English language is essential**
- **Strong classroom management and effective communication skills are required**
- **Candidates must possess working knowledge of computer applications**

**Note :** To apply, interested candidates should submit their resume, a passport-sized photograph, and self-attested copies of all relevant documents. Applications can be sent via post to the **Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe at Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Navi Mumbai 410206. Alternatively, applications may be submitted by email to rtpsulwe@gmail.com.**

The deadline for all submissions is **Monday, 16th November, 2026.**

For Additional Information Contact :
**7710090800 / 8349876223 / 9821537023**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



## K. G. LIMAYE SARVAJANIK VACHANALAY & GRANTHALAY NOTICE INVITING TENDER

Tender Ref No: [45/26] Date: October 22, 2026

Sealed Tenders are invited on Sq. ft. rate for a **"With Material" basis** (Turnkey Civil & Structural Works, Finishing) from reputed, registered, and experienced Civil Engineering Contractors for the construction of a modern **Ground plus 4 Storey (G+4) Library Building** at Final Plot No, 244, Hirve Guruji Road, Panvel

| | |
|---|---|
| Name of Work | Construction of Ground plus 4 Storey (G+4) Library Building (including civil, structural, finishing, and internal plumbing works with materials). |
| Construction Area | 9,500 sq.ft. (Approx.) |
| Earnest Money Deposit (EMD) | Rs. 50,000/- via Demand Draft. |
| Period of Completion | [18 Months] from the date of issue of Work Order |
| Cost of Tender Document | Rs. 10,000/- (Non-refundable). |
| Eligibility Criteria | Contractors must have successfully completed at least one similar G+4 institutional/commercial building project of equivalent magnitude in the last 5 years, possessing a valid GSTIN, PAN, and license if any |
| Document Availability | Tender Document with all details may be Purchased from the office address below from [23-10-2026] to [30-10-2026] during working hours and upto 5 pm **Address: K. G. Limaye Library Office, Aagri Samaj Hall, Near Dandekar Clinic, Panvel** |
| Last Date & Time of Submission | [November 02, 2026] up to [03:00 PM]. |
| Date & Time of Bid Opening | [November 05, 2026] at [04:00 PM] (Technical Bids) |

The organization reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any easons thereof. Detailed terms and conditions are available in the tender document.

sd-
Chairman]
[K.G. Limaye Sarvajanik
Vachanalay & Granthalay Panvel



## पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा

शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय
पता: नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र – ४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education
Govt.of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran Raigad, Maharashtra - 400704

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/Tele: 022 –27222132 | ईमेल/E-Mail :kvkaranja@gmail.com | KV CODE: 1205 |
| CBSE Affiliation No. 1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE: 27241501112 |

वैबसाइट – **https://nadkaranja.kvs.ac.in** ईमेल: **kvkaranja@gmail.com**

**साक्षात्कार सूचना / Walk-In Interview**

केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष **2026-27** हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक (Post Graduate Teachers)** (भौतिक विज्ञान, भूगोल ,अर्थशास्त्र )/ (**Physics, Geography, Economics**) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |
| **प्रशिक्षित स्नातक शिक्षक (Trained Graduate Teachers)** (अंग्रेजी)/**( English)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (बीए/बी.एस.सी) एवं बी.एड डिग्री और सी.टी.ई.टी |
| विशेष शिक्षक (**Special Educator**) | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा |

**साक्षात्कार दिवस : 28.10.2026 (बुधवार)**
**पंजीकरण समय : 8:00 AM TO 10:00 AM**

नोट: अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट **http://nadkaranja.kvs.ac.in** से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्टआकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**प्राचार्य**
**केवि एन.एडी करंजा**



## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१०५, टी-१०६, टी-१०७, टी-१०८, टी-१०९, टी-११०, टी-१११, टी-११२, टी-११३, टी-११४, टी-११५ आणि टी-११६ (२०२६-२७) अशा एकुण **बारा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २१.१०.२०२६ पासून ते दि. २८.१०.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २८.१०.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

# दुर्बल घटकांना दिलासा!

## नवी मुंबईत ५९ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचे लोकार्पण

### घराजवळच मिळणार उपचार




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

किरकोळ आजारांवरील उपचारांपासून मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारख्या आजारांच्या तपासणीपर्यंतच्या आरोग्य सुविधा आता नागरिकांना घराजवळच उपलब्ध होणार आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे शहरात ५९ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांचे मंगळवारी लोकार्पण करण्यात आले. कोपरखैरणेतील शाळा क्रमांक ९४ येथे हा लोकार्पण सोहळा पार पडला.

या केंद्रांमुळे विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना मोफत प्राथमिक आरोग्य सेवा मिळणे सुलभ होणार असून, किरकोळ आजारांसाठी महापालिकेच्या मोठ्या रुग्णालयांमध्ये जाणाऱ्या रुग्णांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आणि १५व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून शहरी भागातील प्राथमिक आरोग्य सेवा बळकट करण्याच्या उद्देशाने ही केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. नागरिकांना त्यांच्या निवासस्थानाजवळ दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान करणे आणि आवश्यक उपचार वेळेत मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे.

नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांमध्ये ताप, खोकला आणि इतर किरकोळ आजारांवर प्राथमिक उपचार व तपासणी केली जाणार आहे. माता आणि बाल आरोग्य सेवेंतर्गत गर्भवती महिलांची तपासणी, लसीकरण, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची काळजी तसेच आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे निदान करण्यासाठीही या केंद्रांमध्ये तपासणी व समुपदेशनाची सुविधा उपलब्ध असेल. याशिवाय रक्ताची तपासणी आणि मूलभूत प्रयोगशाळा चाचण्या मोफत करण्यात येणार आहेत. आवश्यकतेनुसार रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळावा, यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे वैद्यकीय सल्ल्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दरम्यान, विजयादशमीच्या मुहूर्तावर कोपरखैरणे सेक्टर ११ येथील नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ९४ (सीबीएसई) मधील चौथ्या मजल्यावरील नूतन अत्याधुनिक सभागृहाचेही उद्घाटन करण्यात आले. प्रत्येक नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत आरोग्य सेवा दिली जाणार आहे. या केंद्रांमुळे नागरिकांना प्राथमिक उपचारांसाठी मोठ्या रुग्णालयांमध्ये जाण्याची गरज कमी होईल तसेच आजारांचे वेळेत निदान व उपचार शक्य झाल्याने महापालिका रुग्णालयांवरील रुग्णभार कमी होण्यास मदत होईल.

# भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

## दुष्काळग्रस्तांच्या पाठीशी उभे राहिल्याबद्दल पत्रकाद्वारे कौतुक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५,००० रुपयांची अग्रिम आर्थिक मदत देण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच दिलासादायक आहे. बळीराजाने घेतलेले कष्ट, वाया गेलेले पीक व त्याच्यावर आलेले आर्थिक संकट याची भरपाई केवळ पैशांत होऊ शकत नाही, मात्र संकटात सरकार पाठीशी आहे, हा विश्वास शेतकऱ्यांसाठी मोठा आधार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाचे नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी एका पत्रकाद्वारे आभार मानले आहेत.



डॉ. राजेश पाटील यांनी म्हटले की, राज्यातील महायुती सरकारने यापूर्वीही शेतकऱ्यांना कर्जमाफी, पीकविमा, कृषी पंपांच्या ४८,००० कोटी वीजबिल माफी, दुष्काळ घोषित तालुक्यात कर्जवसुलीच्या तगाद्यापासून संरक्षण अशा अनेक निर्णयांद्वारे मदतीचा हात दिला आहे. तसेच पीएम किसान सन्मान निधीसोबत राज्य सरकारच्या सहभागातून नमो शेतकरी महासन्मान निधीच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचे काम सुरू आहे. तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केले आहे. दुष्काळात दिवाळीपूर्वी ५,००० रुपयांची ही मदत अंतिम मदत नसून अग्रिम मदत आहे. पुढील पंचनामे व शासनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचा योग्य आढावा घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार निश्चितपणे पुढाकार घेईल, असा ठाम विश्वास डॉ. राजेश पाटील यांनी व्यक्त केला.

यासाठी ६,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळात शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीबाबत महाराष्ट्र व कर्नाटकातील उपाययोजनांची तुलना करणेही आवश्यक आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी ५,००० रुपयांची अग्रिम मदत जाहीर करण्यात आली. कर्नाटक सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदतीबाबत वेगळी भूमिका घेतली. संकटकाळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होते, असेही डॉ. राजेश पाटील यांनी पत्रकात म्हटले आहे.

# गोरक्षनाथ गडावर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड, मांजरसुंबा, पो. जेऊर, ता. जि. अहिल्यानगर येथे वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील खानावले गावचे रहिवासी कै. बाळाराम कोंडाजी लबडे यांच्या स्मरणार्थ अकराव्या वर्षी अखंड हरिनाम उत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर ते मंगळवार दि. २७ ऑक्टोबर या कालावधीत हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

सोहळ्याला गुरुवर्य महंत आनंद महाराज खंडागळे, चौक आणि ह.भ.प. जगन्नाथ बाबा रत्नाकर, क्षेत्र संगम यांचे कृपाशीर्वाद लाभणार आहेत. पाच दिवस चालणाऱ्या उत्सवात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कीर्तन व काल्याच्या



कीर्तनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे सोहळा वारकरी संप्रदायासाठी पर्वणी ठरणार आहे. कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव मोहनशेठ लबडे दरवर्षी विविध धार्मिक स्थळांवर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करतात.

# तळोजात फक्र-ए-निस्वां अवॉर्डने गुणवंत महिलांचा गौरव

**पनवेल : वार्ताहर**

महिलांचा सन्मान, शिक्षण आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजि.)च्या महिला विभागातर्फे तळोजा फेज १ आणि फेज २ येथे 'ऑल महाराष्ट्र वुमेन्स कॉन्फरन्स व फक्र-ए-निस्वां अवॉर्ड २०२६'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. डॉक्टर, शिक्षिका, मुख्याध्यापिका, उद्योजिका, व्यावसायिक महिला व सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

महिलांचे शिक्षण, आत्मविश्वास, स्वावलंबन, समान संधी आणि समाजाच्या विकासातील त्यांची भूमिका यावर




मार्गदर्शन करण्यात आले. महिलांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्या सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात, असा संदेश या परिषदेतून देण्यात आला. कार्यक्रमाला ऑल इंडिया उलमा बोर्डाचे राष्ट्रीय सरचिटणीस अन्जार अन्वर खान, मुंबईचे अध्यक्ष, मुंब्रा येथील नगरसेविका सहर युनूस शेख, तळोजा येथील नगरसेविका शुशी नागी, तसेच रजनी मॅडम आणि पाटील मॅडम यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या.

अॅड. शफी सय्यद यांची रायगड जिल्हाध्यक्षपदी, कुलसुम शेख यांची रायगड जिल्हा महिला विभागाच्या अध्यक्षपदी व शाहनवाज शेख यांची रायगड जिल्हा विद्यार्थी विभागाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. सुमिया सय्यद यांची नवी मुंबई विद्यार्थी विभागाच्या अध्यक्षपदी, शमा खान यांची तळोजा वॉर्ड महिला विभागाच्या अध्यक्षपदी, हसीना खान यांची उपाध्यक्षपदी, जमात पोटे यांची तालुका स्तरावरील उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. हाजी खान यांच्या मार्गदर्शनाखाली ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या संपूर्ण टीमने कार्यक्रमाचे आयोजन केले.

# फ्लेमिंगो सिटीत गुलाबी पाहुण्यांचे लवकरच आगमन : पाणथळ क्षेत्रांच्या स्थितीबाबत चिंता

**नवी मुंबई : बातमीदार**

यंदाच्या हिवाळ्यात मुंबई आणि नवी मुंबई परिसरात फ्लेमिंगो पक्ष्यांचे नेहमीपेक्षा लवकर तसेच कदाचित मोठ्या संख्येने आगमन होण्याची अपेक्षा आहे, मात्र या गुलाबी पाहुण्यांना आकर्षित करणाऱ्या पाणथळ जागांची स्थिती चिंताजनक असल्याचा इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला आहे. प्रदूषित पाणी, शेवाळाची अतिवाढ आणि भरती-ओहोटीच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे यामुळे फ्लेमिंगोंच्या खाद्य अधिवासांना धोका निर्माण झाला आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनने म्हटले आहे.

सृष्टी कन्झर्व्हेशन फाउंडेशनचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ मृगांक प्रभू यांनी यंदा फ्लेमिंगो पक्षी लवकर आणि कदाचित मोठ्या संख्येने येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. कच्छमध्ये यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने तेथील पाण्याची पातळी आणि खाद्य उपलब्धतेवर परिणाम होऊ शकतो. परिणामी फ्लेमिंगो योग्य खाद्य अधिवासांच्या शोधात नेहमीपेक्षा लवकर स्थलांतर करू शकतात,



असे सेंट्रल एशियन फ्लायवेवरील पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करणारे प्रभू यांनी सांगितले. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी डीपीएस फ्लेमिंगो लेक, एनआरआय वेटलँड आणि टी. एस. चाणक्य वेटलँड या तीन प्रमुख अधिवासांची स्थिती फ्लेमिंगोंच्या स्वागतासाठी पुरेशी चांगली नसल्याची चिंता व्यक्त केली.

गुलाबी पाहुण्यांना पाहण्यासाठी पक्षीप्रेमी नवी मुंबई व रामसर स्थळाचा दर्जा असलेल्या ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यात येतात. नॅटकनेक्ट फाउंडेशनने सुरुवातीला केलेल्या तपासण्यांमध्ये तिन्ही ठिकाणांच्या पाण्याच्या नमुन्यांत प्रदूषणाचे वाढलेले निर्देशक आढळले. मागील स्थलांतर हंगामात फ्लेमिंगो राजस्थानमधील सांभर सरोवराकडे उत्तरेकडे गेले होते, तर मुंबई परिसरातील त्यांचे आगमन लहान थव्यांमध्ये सुरू झाले होते, असे कुमार म्हणाले. यंदा पक्षी लवकर आल्यास पर्यायी अधिवासांच्या शोधात असलेल्या येथील पाणथळ जागांमध्ये पुरेसे खाद्य मिळेल का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

नवी मुंबई एन्व्हायर्नमेंट प्रिझर्व्हेशनचे संदीप सरीन यांनी फ्लेमिंगोंच्या आगमनापूर्वी पाणथळ जागांची स्वच्छता करण्याची मागणी केली. पाणथळ जागांचे आरोग्य केवळ फ्लेमिंगोंसाठीच महत्त्वाचे नाही. मासेमारी करणाऱ्या समुदायांना आधार देतात व भरतीच्या अतिरिक्त पाण्याचा, पुराच्या पाण्याचा निचरा शोषून घेणाऱ्या नैसर्गिक स्पंजप्रमाणे काम करतात, असे सरीन म्हणाले.

# एपीएमसीत २८८ क्विंटल स्ट्रॉबेरीची आवक

## हवामानाच्या लहरीपणाचा फटका बसण्याची शक्यता

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

हिवाळ्याच्या हंगामात ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्या स्ट्रॉबेरीचे वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) फळबाजारात आगमन झाले आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर मंगळवारी बाजारात तब्बल २८८ क्विंटल स्ट्रॉबेरीची आवक झाली. मात्र, अनिश्चित पाऊस आणि वाढत्या तापमानामुळे पिकावर परिणाम होण्याची शक्यता असून यंदा स्ट्रॉबेरीचा हंगाम महिनाभराने कमी होण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, साधारणतः नोव्हेंबरपासून सुरू होणारा स्ट्रॉबेरीचा हंगाम यंदा ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. सध्या नाशिक, सापुतारा आणि महाबळेश्वर या भागांतून स्ट्रॉबेरी बाजारात दाखल होत आहे. हंगामाच्या सुरुवातीला आवक मर्यादित असताना स्ट्रॉबेरीचे दर तुलनेने अधिक असतात. प्रतवारी, आकार आणि गुणवत्तेनुसार



दरांत फरक पडतो. सध्या घाऊक बाजारात एका लहान खोक्याची किंमत १५० रुपयांपासून सुरू होत असून, चांगल्या प्रतीच्या स्ट्रॉबेरीचे दर ६०० ते ७०० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. स्ट्रॉबेरीचा हंगाम साधारणपणे थंडीच्या काळात बहरतो. हे पीक थंड हवामानासाठी अनुकूल असल्याने तापमानातील चढ-उतार आणि अवकाळी पावसाचा त्याच्या वाढीवर तसेच उत्पादनाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

यंदा हवामानात सातत्याने बदल होत असल्याने स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांसमोर आव्हान निर्माण झाले आहे. महाबळेश्वर, पाचगणी आणि वाई हा महाराष्ट्रातील स्ट्रॉबेरी उत्पादनाचा प्रमुख पट्टा मानला जातो. याशिवाय नाशिक परिसरातही स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतले जाते. दरम्यान, थंड वातावरणात चांगल्या प्रतीची स्ट्रॉबेरी तयार होत असल्याने तापमानातील वाढ उत्पादकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. प्रतिकूल हवामानामुळे उत्पादनाचा कालावधी कमी झाल्यास बाजारातील आवक आणि दरांवरही त्याचे पडसाद उमटू शकतात.

यंदाच्या वर्षी दसऱ्याच्या मुहूर्तावर स्ट्रॉबेरीची आता झालेली आवक ही हंगामाची नांदी मानली जात आहे. आगामी काळात थंडी कधी सुरू होते आणि हवामान कसे राहते यावर स्ट्रॉबेरीचे उत्पादन व बाजारातील उपलब्धता अवलंबून असेल. आवक मर्यादित राहिल्यास सध्याचे चढे दर टिकून राहण्याची शक्यता असून आवक वाढल्यानंतरच ग्राहकांना दरांमध्ये दिलासा मिळू शकतो. मागील १० दिवसांपासून बाजारात स्ट्रॉबेरीची किरकोळ आवक होत आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर चांगली आवक झाली असली तरी नोव्हेंबरमध्येच खऱ्या अर्थाने राज्यातून व राज्याबाहेरून स्ट्रॉबेरीची आवक सुरू होईल. यंदा लहरी हवामानामुळे फळवाढीवर तसेच उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हंगाम एक महिना कमी राहण्याची शक्यता आहे, असे एपीएमसी फळबाजार व्यापारी सागर नवले यांनी सांगितले. या सर्व पार्श्वभूमीवर स्ट्रॉबेरीचे चाहते कसा प्रतिसाद देतात हे पाहावे लागेल.

# रुग्णांना सुलभ आरोग्यसेवेसाठी 'तेरणा'चा पुढाकार

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रुग्णालये, विमा कंपन्या आणि थर्ड पार्टी अॅडमिनिस्ट्रेटर्स (टीपीए) यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरतर्फे मुंबईत टीपीए आणि इन्शुरन्स सायंटिफिक कॉन्क्लेव्ह २०२६चे आयोजन करण्यात आले. या परिषदेत टीपीए आणि विमा क्षेत्राशी संबंधित विविध शंका, क्लेम प्रक्रियेतील अडचणी, कॅशलेस उपचारांना मंजुरी मिळण्यास होणारा विलंब आणि रुग्णालये व विमा कंपन्यांमधील समन्वय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

दरम्यान, या परिषदेमुळे आता आरोग्यसेवा आणि विमा क्षेत्रातील प्रतिनिधींना आपापल्या समस्या प्रभावीपणे मांडण्यासाठी, गैरसमज दूर करण्यासाठी तसेच प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी एक प्रभावी आणि मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. पारदर्शक संवाद, स्पष्ट कार्यपद्धती आणि वेळेत निर्णय घेण्याची गरज यावर तज्ज्ञांनी विशेष भर दिला.

# खारघरमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सत्याग्रह महाविद्यालय, खारघर, नवी मुंबई येथे पाली भाषा व बुद्धिझम विभागाच्या वतीने ७०व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सुप्पारक भवन, सेक्टर १९, खारघर येथे मंगळवारी मोठ्या उत्साहात कार्यक्रम संपन्न झाला. यानिमित्ताने नवी मुंबईतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या अभ्यासक, विचारवंत आणि सामाजिक संशोधक यांच्या सहभागातून 'भारत बौद्धमय झाला का?' या विषयावर खुल्या संवादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी खुल्या संवादात बोलताना प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना लोकशाही शासनव्यवस्थेचा पाया दिला. संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नसून प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचे,



समान संधीचे आणि सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन आहे. १९५० पासून भारतीय लोकशाही, शिक्षणाचा विस्तार, कायद्यापुढील समानता आणि विविध सामाजिक घटकांना मिळालेल्या प्रतिनिधित्वाच्या संधी यातून बुद्धविचारांशी सुसंगत मूल्यांचा प्रवास दिसून येतो, असे मत प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी मांडले.

भारत पूर्णपणे बौद्धमय झाला आहे का, याचे उत्तर केवळ धार्मिक लोकसंख्येवरून देता येणार नाही. मात्र, संविधानिक मूल्यांचा स्वीकार, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समतेची जाणीव, वंचित घटकांना संधी आणि मानवी प्रतिष्ठेचा आग्रह या प्रक्रियांमधून भारत बौद्ध सांस्कृतिक मूल्यांच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे दिसते. या मूल्यांचे प्रत्यक्ष आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर किती रुजले आहे, हीच त्याची खरी कसोटी आहे, असे डॉ. जी. के. डोंगरगावकर म्हणाले.

'भारत बौद्धमय झाला का?' या चर्चेत प्रा. सतीश पवार, प्रा. वनिता सूर्यवंशी, प्रा. ललिता यशवंते, प्रा. नेहा राणे, प्रा. एम. एल. सूर्यवंशी, प्रा. बी. बी. शिंदे, प्रा. ऋषिकेश कांबळे, प्राचार्य नेहा राणे, सुजाता भोसले, प्रीती कौर यांसह इतर मान्यवरांनीही सहभाग घेतला. प्रास्ताविक प्रा. विनिता सूर्यवंशी, तर सूत्रसंचालन प्राचार्य नेहा राणे यांनी केले.

# बळीराजाला जास्तीत जास्त मदत मिळवून देणार -पालकमंत्री

धाटाव : प्रतिनिधी

सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यानंतर पाऊस झालेला नसल्याने शेतातील भातपिकावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी भातपीक आडवे पडले असून दाणेही पूर्णपणे भरलेले नाहीत. निसर्गाच्या या संकटात बळीराजाला महायुती सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सर्व आमदार आणि खासदार प्रयत्न करतील, अशी ग्वाही रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी बुधवारी (दि.२१) दिली. रोहा येथे श्री धावीर महाराजांच्या सशस्त्र मानवंदना सोहळयासाठी आले असताना सामाजिक कार्यकर्ते अप्पा देशमुख यांच्या निवासस्थानाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.



शेतकऱ्यांच्या सध्याच्या परिस्थितीवर भाष्य करताना पालकमंत्री गोगावले म्हणाले की, निसर्गाने शेतकऱ्यांवर मोठे संकट आणले आहे. शेतातील भातपिकाची वस्तुस्थिती शासनासमोर मांडली जाणार असून रायगड जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुकेही दुष्काळग्रस्त भाग म्हणून घोषित व्हावेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आज श्री धावीर महाराजांच्या चरणी प्रार्थना करतो की, माझा बळीराजा सुखी राहू दे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी, यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केल्या गेलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना पालकमंत्री गोगावले यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रावर संकट आले की सर्वप्रथम मदतीसाठी धावून जाणारे नेतृत्व आहे. चक्रीवादळ असो, कोरोना महामारी असो किंवा अन्य संकटे, अशा प्रत्येक वेळी त्यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. काश्मीरमध्ये अडकलेल्या नागरिकांना विमानाने परत आणण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते.

## एमआयडीसीतील बंद कारखाने सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार

***रायगड जिल्ह्यातील औद्योगिक विकास आणि स्थानिक तरुणांच्या रोजगाराचा प्रश्नही यावेळी पालकमंत्री गोगावले यांनी मांडला. जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रांमध्ये अधिकाधिक उद्योग सुरू व्हावेत, बंद पडलेले कारखाने पुन्हा कार्यान्वित व्हावेत आणि उपलब्ध जागांवर नवीन उद्योग उभे राहावेत यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.एमआयडीसीमुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात तसेच औद्योगिक परिसरातील ग्रामपंचायतींनाही आर्थिक बळ मिळते. त्यामुळे रोहा एमआयडीसीतील बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे, तेथे नवीन कारखाने आणून रोजगारनिर्मितीला चालना देणे हे आमचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.***

शिंदे हे संकटाच्या काळात नागरिकांच्या मदतीला धावून जाणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांच्यावर करण्यात आलेले आरोप चुकीचे आहेत. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख दक्षिण रायगड प्रमोद घोसाळकर, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, शिवसेना तालुकाप्रमुख उद्देश वाडकर, संपर्कप्रमुख संदेश मोरे, पंचायत समिती सदस्य तथा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, माजी सरपंच विकास पाटील, आशिष जंगम, संतोष खेरटकर, लालता कुशवाह, उस्मान रोहेकर आदी उपस्थित होते.

# पोलीस हुतात्म्यांना रायगड दलातर्फे अभिवादन

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड पोलीस दलातर्फे बुधवारी (दि. २१) पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शहीद जवानांना तीन राउंड फायर करून शोक सलामी देण्यात आली.

रायगड पोलीस मुख्यालय मैदान अलिबाग येथे पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, श्रीमती नदाप, परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक विजय बाविस्कर, प्लाटून क्रमांक १ चे राखीव पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील सावंत, प्लाटून क्रमांक २चे अमोल गंगधर तसेच बँड पथक व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाखमधील हॉट स्प्रिंग्स येथे हरवलेल्या शोधपथकातील कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी गेलेल्या भारतीय पोलीस पथकावर चिनी सैन्याने घात करून गोळीबार व ग्रेनेडद्वारे हल्ला केला. या हल्ल्यात १० शूर भारतीय पोलीस कर्मचारी हुतात्मा झाले. देशाच्या सीमांचे रक्षण करताना या जवानांनी दाखविलेल्या अतुलनीय शौर्याची, त्यागाची व कर्तव्यनिष्ठेची स्मृती कायम राहावी यासाठी जानेवारी १९६०मध्ये झालेल्या पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेत २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी संपूर्ण देशभरात पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यात येते. यंदाही अभिवादन केले गेले.



# रोह्यात नाभिक समाजमंदिरासाठी शासकीय जागा उपलब्ध करून द्या

### भाजपचे महामंत्री शैलेश रावकर यांची मागणी

नागोठणे : बातमीदार

रायगड जिल्हा नाभिक समाजाचे क्रियाशील कार्यकर्ते तथा भारतीय जनता पक्षाचे रोहा तालुका महामंत्री शैलेश रावकर यांनी रोह्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानी उपस्थित असलेले रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांची भेट घेऊन नाभिक समाजाच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा केली.

यावेळी रोहा शहरात नाभिक समाजासाठी समाज मंदिर उभारण्यासाठी शासकीय स्तरावर समाजाच्या मालकीची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी रावकर यांनी पालकमंत्री गोगावले यांच्याकडे केली. नाभिक समाजाच्या



सामाजिक, सांस्कृतिक व विविध सामुदायिक उपक्रमांसाठी समाज मंदिराची आवश्यकता असून याबाबत सकारात्मक मार्ग काढून सहकार्य करावे, अशी विनंतीही त्यांनी केली.

शैलेश रावकर यांच्या मागणीची दखल घेत नाभिक समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत योग्य तो मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन पालकमंत्री गोगावले यांनी दिले.

# साई परिसरात इंटरनेट अन् वीजपुरवठा वारंवार खंडित

## ऑनलाइन कामांचा होतोय खोळंबा

माणगाव : बातमीदार

माणगाव तालुक्यातील साई परिसरात इंटरनेट सेवा वारंवार ठप्प होत असून वीजपुरवठाही खंडित होत आहे. इंटरनेट आणि वीज या दोन्ही महत्त्वाच्या सेवा अनियमित असल्यामुळे विद्यार्थी, व्यापारी, शासकीय कामांसाठी येणारे नागरिक तसेच सर्वसामान्य ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन सेवा नियमित कराव्यात, अशी मागणी होत आहे.

सध्याच्या डिजिटल युगात शासकीय तसेच खासगी क्षेत्रातील बहुतांश कामे ऑनलाइन पद्धतीने केली जातात. विविध शासकीय दाखले, ऑनलाइन अर्ज, बँकिंग व्यवहार, आर्थिक देवाणघेवाण, शैक्षणिक कामे आणि इतर आवश्यक सेवांसाठी इंटरनेटची गरज भासते. मात्र, साई परिसरात इंटरनेट सेवा वारंवार बंद पडत असल्याने या कामांचा खोळंबा होत आहे. त्यातच वीजपुरवठाही वारंवार खंडित होत असल्यामुळे नागरिकांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडत आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर इंटरनेट सेवेवरही परिणाम होत असल्याने ऑनलाइन कामे पूर्ण करणे कठीण बनते. अनेकदा महत्त्वाच्या कामांसाठी नागरिकांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे दैनंदिन व्यवहारांवरही परिणाम होत असून संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

साई हे ठिकाण चांदोरे, रानवडे, नळेफोडी, विहुले, विहुलेकोंड, डोंगरोली, काकळ, उसर, खैरेवाडी, उसरकोंड, काकळकोंड, काकळ बौद्धवाडी यांसह आसपासच्या अन्य गावांसाठी बाजारपेठ आणि विविध कामांच्या दृष्टीने महत्त्वाचे मध्यवर्ती ठिकाण मानले जाते. या गावांतील नागरिक विविध खरेदी, शासकीय कामे आणि इतर गरजांसाठी साई येथे येत असतात, मात्र या परिसरातच इंटरनेट आणि वीजपुरवठ्याच्या समस्या वारंवार निर्माण होत असल्याने दूरवरून येणाऱ्या नागरिकांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. आवश्यक सेवा उपलब्ध नसल्यामुळे अनेकांना कामे पूर्ण न करताच परतावे लागण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

साई परिसरातील इंटरनेट सेवा आणि वीजपुरवठा नियमित ठेवण्यासाठी संबंधित कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच वीज वितरण विभागाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. इंटरनेट सेवा वारंवार खंडित होण्यामागील कारणे शोधून तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, तक्रारींची त्वरित दखल घ्यावी आणि वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### विद्यार्थ्यांसह व्यावसायिकांनाही फटका

***ऑनलाइन शिक्षण, अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती, परीक्षांचे अर्ज आणि इतर शैक्षणिक कामांसाठी विद्यार्थ्यांना इंटरनेटची आवश्यकता असते. मात्र, इंटरनेट सेवा वारंवार बंद पडल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. त्याचप्रमाणे ऑनलाइन व्यवहारांवर अवलंबून असलेले व्यावसायिक, दुकानदार आणि इतर ग्राहकांनाही याचा फटका बसत आहे. शासकीय कार्यालयांशी संबंधित ऑनलाइन कामे करताना इंटरनेट उपलब्ध नसल्यास अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि इतर प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होत नाही. परिणामी नागरिकांची महत्त्वाची कामे रखडत असून वेळेचा अपव्यय होत आहे. या समस्येवर तोडगा निघणे आवश्यक आहे.***

# रायगडात फुलपाखरांच्या १४७ प्रजातींचा मुक्त संचार

पाली : प्रतिनिधी

पश्चिम घाटाचा विस्तीर्ण पट्टा, मुबलक झाडेझुडपे, विस्तीर्ण निसर्गरम्य समुद्रकिनारा आणि कांदळवने या पोषक वातावरणामुळे पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात सध्या रंगीबेरंगी फुलपाखरांचा संचार वाढला आहे. जिल्ह्यात तब्बल १४७ प्रजातींचा मुक्त संचार पाहायला मिळत आहे. यात महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू 'ब्ल्यू मॉरमॉन' (राणी पाकोळी) आणि पश्चिम घाटातील सर्वात मोठे दुर्मिळ 'सदर्न बर्ड विंग' यांचाही समावेश आहे.

जिल्ह्यात फुलपाखरांना लागणारे 'होस्ट प्लांट्स' (फूड प्लांट्स) मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. नर-मादीच्या मिलनानंतर मादी कडूनिंब, कढीपत्ता, सीताफळ, रामफळ, लिंबू, कदंब व अशोक यांसारख्या झाडांवर अंडी घालते. सोनटक्का व पानफुटीवर 'ग्रास डीमन' आणि 'रेड पियरो' ही सुंदर फुलपाखरे वाढतात. या रंगीबेरंगी दुनियेमुळे पर्यटक व स्थानिक नागरिक मोहीत होत असून, तिनविरा धरणाजवळ खास खाजगी फुलपाखरू उद्यानही उभारण्यात आले आहे. ग्रीन टच नर्सरीचे मालक अमित निंबाळकर म्हणाले की, परसबागेत फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी 'होस्ट प्लांट'ला नागरिकांकडून मोठी मागणी आहे.

माणगाव येथील प्राणी-पक्षी व फुलपाखरू अभ्यासक शंतनू कुवेस्कर यांनी सांगितले की, जिल्ह्यात निसर्गसंपदा आणि सुरक्षित पर्यावरण आहे. घराच्या अंगणात पपई, पेरूसारखी फळे किंवा सडका बांगडा मासा ठेवूनही फुलपाखरांना आकर्षित करता येते. जगात १७,५००, भारतात १५०० आणि महाराष्ट्रात ३४५ फुलपाखरांच्या जाती आहेत. त्यातील १४७ प्रजाती एकट्या रायगडात आहेत. यात गुलाबी राणी, पितांबरी, सांजपरी, हळदीकुंकू, नील भिरभिरी, मयूर भिरभिरी व शुष्क पर्ण यांचा समावेश आहे.

झपाट्याने होणारे औद्योगिकीकरण आणि प्रदूषण यामुळे वनस्पती नष्ट होऊन फुलपाखरांच्या अळया व सुरवंटांचा अधिवास धोक्यात येत आहे, असा इशारा अभ्यासकांनी दिला आहे. तणनाशकांचा वापर फुलपाखरांसाठी घातक ठरत आहे, असे अलिबाग येथील निसर्ग, फुलपाखरू, प्राणी व पक्षी अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले.

वनक्षेत्रपाल समीर शिंदे म्हणाले की फुलपाखरे परागीकरणात मोठी मदत करतात. त्यामुळे जैवविविधता टिकवण्यासाठी त्यांच्या कांदळवनातील व जंगलातील अधिवासाचे संवर्धन करणे गरजेचे आहे.



### शाळेत बटरफ्लाय गार्डन

*नवीन पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात फेब्रुवारी महिन्यात बटरफ्लाय गार्डन उभारण्यात आले आहे. या उद्यानामुळे विद्यार्थ्यांना फुलपाखरांचे जीवनचक्र आणि त्यांचे पर्यावरणातील महत्त्व समजण्यास मदत होत आहे. या उपक्रमातून मुलांमध्ये लहान वयातच पर्यावरण आणि जैवविविधतेविषयी निस्सीम प्रेम निर्माण होईल, असे शिक्षक शशिकांत कुपटे यांनी सांगितले.*

# सुधागडात गरजू विद्यार्थ्यांना सँडल, दप्तरांचे वाटप

पाली : प्रतिनिधी

द्या एक हात मदतीचा, सामाजिक बांधीलकीचा, शैक्षणिक क्रांतीचा या संकल्पनेतून गोरेगाव (मुंबई) येथील उन्नतनगर-अक्षय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून सुधागड तालुक्यातील दुर्गम भागातील शाळांमधील ३५८ गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना सँडल, दप्तर आणि शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.



काही महिन्यांपूर्वी उन्नतनगर सोसायटीचे अध्यक्ष कानमल देशलेहरा, विवेकानंद सावंत आणि मनिष देशलेहरा यांनी या भागातील शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या होत्या. त्यानंतर देशलेहरा यांनी आपल्या मुलास राजेश देशलेहरा यांना या बिकट परिस्थितीत शिकणाऱ्या मुलांना मदत करण्याची प्रेरणा दिली. मग मुंबई पोलीस हवालदार (मूळ रा. हातोंड सुधागड) राजेंद्र वाघमारे यांच्या समन्वयातून सुधागड तालुक्यातील रा.जि.प. शाळा महागाव, देऊळवाडी चंदरगाव, हातोंड, माठल, केलगान, गोंदाव, कसईशेत, पत्र्याची वाडी आणि माध्यमिक विद्यालय चंदरगाव येथील ऐकूण ३५८ विद्यार्थ्यांची यादी तयार करून हे साहित्य सुपूर्द करण्यात आले. गेल्या १३ वर्षांपासून हा उपक्रम अखंड चालवणारे हवालदार वाघमारे यांनी देशलेहरा कुटुंबाचे विशेष आभार मानले.

या कार्यक्रमाला राजेश देशलेहरा, विवेकानंद सावंत, मधुकर बनसोडे यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, अंगणवाडी मदतनीस, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि माजी विद्यार्थीही उपस्थित होते.

# भिवपुरी रोड रेल्वे स्टेशनवरील लिफ्ट बंद

कर्जत : प्रतिनिधी

भिवपुरी रोड रेल्वेस्थानकातील उद्वाहन (लिफ्ट) बंद झाली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवासी आणि दिव्यांगांची गैरसोय होत आहे. या लिफ्टच्या दुरुस्तीची मागणी भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे. याबाबतचे निवेदन अध्यक्ष किशोर गायकवाड यांची स्टेशन प्रबंधकांना दिले आहे.

मध्य रेल्वेवरील मुंबई-पुणे या मेन लाइनवरील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकातील कर्जत दिशेकडील लिफ्ट अचानक बंद पडली. यामुळे रेल्वे प्रवाशांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी, महिला, लहान मुले आणि गुडघेदुखीचा त्रास असलेल्या प्रवाशांना सर्वाधिक फटका बसत आहे. प्रवाशांच्या सुविधेसाठी स्थानकात लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, मात्र ती वारंवार बंद पडत असल्यामुळे जिन्यांचा वापर करणे अनेक प्रवाशांसाठी विशेषतः शारीरिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या प्रवासीवर्गासाठी अडचणीचे ठरत आहे.

भिवपुरी रोड रेल्वेस्थानकावरील बंद असलेली लिफ्ट तातडीने दुरुस्त करून ती पूर्ववत सुरू करण्यात यावी, अशी मागणी येथील रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी केली आहे. याप्रकरणी लिफ्ट बंद असल्याची अधिकृत तक्रार स्टेशन प्रबंधक यांच्याकडे देण्यात आली असून स्टेशन डायरीत ती नोंदवण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रवाशांचा त्रास कमी करावा, अशी मागणी केली जात आहे.

# मानगडावर दुर्गवीरांकडून विजयोदुर्गोत्सव साजरा

माणगाव : बातमीदार

गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या दुर्गवीर प्रतिष्ठानच्या सदस्यांनी यंदाचा दसरा ऐतिहासिक मानगडावर उत्साहात साजरा केला. या विजयोदुर्गोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने गडावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक पद्धतीने साजऱ्या झालेल्या या उत्सवातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या इतिहासाचे आणि गडकोटांच्या संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

दसऱ्यानिमित्त मानगडाचा महादरवाजा झेंडूच्या फुलांच्या तोरणांनी, रंगीबेरंगी पताकांनी, रांगोळ्यांनी आणि फुलांच्या आकर्षक सजावटीने सुशोभित करण्यात आला होता. गडावरील तटबंदी आणि बुरुजांच्या सान्निध्यात सजलेला मानगड उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

उत्सवाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर गडावरील श्री शंभूमहादेव आणि



गडदेवता विंझाई देवीचे विधिवत पूजन करण्यात आले. ढालकाठी बुरुजावर भगव्या जरीपटका ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. आरत्या, जागर, गोंधळगीते आणि गारद अशा पारंपरिक कार्यक्रमांमुळे गडावर शिवकालीन संस्कृतीचा अनुभव उपस्थितांना घेता आला.

दसऱ्याच्या परंपरेनुसार सोन्याचे प्रतीक मानले जाणारे आपट्याचे पान एकमेकांना देत दुर्गवीरांनी परस्परांना गळाभेट देऊन विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यातून ऐतिहासिक परंपरा, बंधुभाव आणि गडाविषयीची आत्मीयता यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

# भारताचा झिम्बाब्वेला क्लीन स्विप!



**रायपूर : वृत्तसंस्था**

भारताने रायपूरमधील तिसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेवर विजय मिळवत ३-०च्या फरकाने मालिकेत एकतर्फी विजय मिळवला. भारताने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा संघ १२४ धावा करू शकला आणि परिणामी भारताने ९२ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

या सामन्यात हरमनप्रीत कौर हिने अवघ्या ४१ चेंडूंत नाबाद ९१ धावांची वादळी खेळी केली. तिच्या या खेळीत १० चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर हरमनप्रीतची ही मोठी खेळी ठरली. हरमनप्रीत कौरच्या फलंदाजीवर बरेचदा प्रश्न उपस्थित केले जात होते.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. सलामीवीर शफाली वर्माने अवघ्या ३७ चेंडूंत ६९ धावांची आक्रमक खेळी केली. तिच्या खेळीत सहा चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. शफाली आणि हरमनप्रीत यांच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताने २० षटकांत सात गडी गमावून २१६ धावांचा डोंगर उभा केला. हरमनप्रीतने २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतरही फटकेबाजी सुरू ठेवली. झिम्बाब्वेकडून बेलोव्हड बीझाने तीन विकेट्स घेतल्या.

भारताने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेच्या संघाला अपेक्षित सुरुवात करता आली नाही, मात्र शार्ने मेयर्सने ४९ चेंडूंत ६० धावा, तर बेलोव्हड बीझाने ५० चेंडूंत ४४ धावा करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला आणि त्यांना २० षटकांत ७ बाद १२४ धावांपर्यंतच मजल मारता आली.

### हरमनप्रीत झाली भावूक

भारताच्या तिसऱ्या टी-२० सामन्यातील विजयाची स्टार ठरली हरमनप्रीत कौर. तिने अवघ्या ४१ चेंडूंत नाबाद ९१ धावांची वादळी खेळी केली. या कामगिरीनंतर मुलाखतीत बोलताना हरमनप्रीत भावुक झाली. ती म्हणाली, मला फक्त खेळाचा आनंद घ्यायचा होता आणि शक्य तितका वेळ फलंदाजी करायची होती. मला ते करता आले याचे श्रेय तुम्हालाही द्यायला हवे. माझ्यावर खूप मेहनत घेणाऱ्या हिमांशू सरांचे मला विशेष आभार मानायचे आहेत. आजच्या माझ्या फलंदाजीचे संपूर्ण श्रेय त्यांनाच जाते, असेही तिने सांगितले.

# जिल्हास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत 'सीकेटी' संघ उपविजेता

## यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय अंडर-१९ हॉलीबॉल स्पर्धा खारघरमधील बालभारती स्कूल येथे झाली. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील मुलांचा संघ उपविजेता ठरला.

सीकेटीच्या संघाने जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर उपविजेतेपद पटकाविले. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपविजेत्या हॉलीबॉल संघाचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# द. आफ्रिकेच्या तेंबा बावुमाची विश्वविक्रमी खेळी

**गेकेबेरहा : वृत्तसंस्था**



दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार तेंबा बावुमाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऐतिहासिक खेळी साकारली. गेकेबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्क मैदानावर त्याने पहिल्या डावात १७९ धावांची शानदार खेळी केली. पावसामुळे व्यत्यय आलेल्या या सामन्यात बावुमाने दक्षिण आफ्रिकेचा डाव सावरला आणि या खेळीसह अनेक विश्वविक्रम आपल्या नावे केले.

तिसऱ्या दिवसाचा खेळ संपण्यापूर्वी यजमानांनी डाव घोषित केला. दक्षिण आफ्रिकेची पहिल्या दिवशी २ बाद १२ धावा अशी बिकट अवस्था असताना बावुमा फलंदाजीसाठी मैदानात उतरला. दुसऱ्या दिवशीही दक्षिण आफ्रिकेच्या विकेट्स पडण्याचे सत्र सुरूच राहिले आणि संघाची अवस्था ६ बाद ११० अशी झाली, मात्र कर्णधार बावुमाने हार न मानता संयमी आणि आक्रमक फलंदाजीचा सुरेख मेळ साधला.

दरम्यान, वयाची ३६ वर्षे पूर्ण केल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये १५० धावांची खेळी करणारा बावुमा हा ७६ वर्षांतील पहिला कर्णधार ठरला आहे, तर दक्षिण आफ्रिकेत कसोटी सामन्यात १५०हून अधिक वैयक्तिक धावा करणारा तो दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक वयाचा कर्णधार ठरला. यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा लिंडसे हॅसेट यांनी १९५०मध्ये गेकेबेरहा येथे ही कामगिरी केली होती.

दरम्यान, कसोटी क्रिकेटमध्ये १५० धावांची खेळी करणारा बावुमा हा १९५१नंतरचा दक्षिण आफ्रिकेचा सर्वाधिक वय असलेला कर्णधार ठरला आहे. यापूर्वी डडली नॉर्स यांनी १९५१मध्ये अशी कामगिरी केली होती तसेच २१व्या शतकात कसोटी क्रिकेटमध्ये १५०हून अधिक धावांची खेळी करणारा बावुमा हा तिसऱ्या क्रमांकावरील सर्वात वयस्कर कर्णधार ठरला आहे. त्याच्यापुढे ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह वॉ आणि वेस्ट इंडिजचा ब्रायन लारा आहेत.

### अझरुद्दीनचा विक्रम मोडला

१७९ धावांच्या खेळीसह बावुमाने कसोटी क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १५०किंवा त्याहून अधिक धावा करणारा वयस्कर कर्णधार असल्याचा विक्रम आपल्या नावावर केला. त्याने भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन यांचा विक्रम मोडला. अझरुद्दीन यांनी १९९८मध्ये ईडन गार्डन्सवर स्टीव्ह वॉ यांच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध नाबाद १६३ धावांची खेळी केली होती.

# रोनाल्डोवर ३० दिवसांची बंदी आणि दंड

**लिस्बन (पोर्तुगाल) : वृत्तसंस्था**



पोर्तुगीज फुटबॉल महासंघाने संघाचा कर्णधार आणि स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोवर ३० दिवसांची बंदी घातली असून त्याला २५५ युरोचा दंडही ठोठावला आहे. अलीकडील आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या कालावधीत पोर्तुगालच्या प्रशिक्षण शिबिरातून अचानक बाहेर पडल्यामुळे महासंघाने ही शिस्तभंगाची कठोर कारवाई केली आहे.

सप्टेंबरच्या उत्तरार्धात नॉर्वेविरुद्धच्या २-१ अशा विजयाच्या सामन्यात रोनाल्डोला राखीव फुटबॉलपटूंच्या बाकावर बसावे लागले होते. त्यानंतर त्याचे पोर्तुगालचे प्रशिक्षक जॉर्ज जीझस यांच्यासोबत खटके उडाले. आपल्याला ३० मिनिटे खेळण्याची खात्री देऊनही मैदानात न उतरवल्यामुळे रोनाल्डो नाराज झाला होता. प्रशिक्षकाने समस्या गांभीर्याने घेतली नाही आणि पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण देण्याचे आश्वासन पाळले नाही, असा आरोप रोनाल्डोने केला. अखेरीस डेन्मार्कविरुद्धच्या सामन्यापूर्वी तणाव वाढल्याने त्याने शिबिर सोडले.

अल-नासर क्लबकडून खेळणाऱ्या रोनाल्डोने आपल्या चुकीची जाहीर माफी मागितली आणि स्वतःहून योग्य शिक्षेची मागणी केली. एक आदर्श खेळाडू म्हणून आपल्या कृतींचे मूल्यमापन झाले पाहिजे, असे त्याने मान्य केले. महासंघाने ३० सप्टेंबरपासून ही निलंबनाची कारवाई लागू केल्यामुळे रोनाल्डो १४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पोर्तुगालच्या आगामी आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी पुन्हा संघात परतण्यास पात्र ठरणार आहे.

# राष्ट्रीय लाठी स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंचा डंका

## ३६ सुवर्णांसह ४१ पदकांची कमाई

**अलिबाग : प्रतिनिधी**



गुजरातमधील वापी येथे पार पडलेल्या राष्ट्रीय लाठी स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी तब्बल ३६ सुवर्ण, चार रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण ४१ पदकांची कामा केली. सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, तमिळनाडू आणि गोवा या राज्यांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत मंथन कदम, श्रीयंश म्हात्रे आणि वेद कदम यांनी प्रत्येकी तीन सुवर्णपदके जिंकत विशेष कामगिरी केली. याशिवाय गार्गी सातनाईक, साईशा पाटील, रुद्रा विनय पिळणकर, युक्ता बोरकर, अनन्या निकम, शांभवी कुलकर्णी, किमया पाठारे, आराध्या नखाते, हार्दिक अकोलकर, शिवम संदेश गुंजाळ आणि मल्हार संदेश गुंजाळ यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके पटकावली.

प्रियल तुरे हिने सुवर्णपदकासह कांस्यपदक मिळवले, तर प्रग्णेश पाटील, पार्थ वहाळकर आणि मलये पाटील यांनी सुवर्णपदकासह रौप्यपदक मिळवले.

लाठी असोसिएशन अलिबाग, रायगडचे अध्यक्ष प्रमोद मसाल यांनी पदक विजेत्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पंच प्रियांका संदेश गुंजाळ, सिद्धार्थ पाटील, वेदांत सुर्वे आणि नम्रता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारत-न्यूझीलंड आज पहिली टी-२० लढत

**क्राइस्टचर्च : वृत्तसंस्था**

भारताचा न्यूझीलंड दौरा २२ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. उभय संघांतील पहिली टी-२० आंतरराष्ट्रीय लढत २२ ऑक्टोबर रोजी क्राइस्टचर्च येथील हॅगली ओव्हल मैदानावर होणार आहे. ही पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिली लढत असेल, जी १ नोव्हेंबर रोजी संपणार आहे.

भारतीय संघ आधीच न्यूझीलंडमध्ये पोहचला असून खेळाडूंनी सराव सत्रांना सुरुवात केली आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताची न्यूझीलंडविरुद्धची कामगिरी ऐतिहासिकदृष्ट्या चांगली राहिली आहे. विशेष म्हणजे, २०२६च्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा पराभव करून विजेतेपद पटकावले होते.

# मुंबईची हिमाचल प्रदेशवर मात

## सरफराज खान ठरला विजयाचा हीरो

**मुंबई : प्रतिनिधी**



रणजी ट्रॉफी स्पर्धेत मुंबईने हिमाचल प्रदेश संघाला एक डाव आणि ९७ धावांनी पराभूत केले. हिमाचल प्रदेशने प्रथम फलंदाजी करताना ३९.५ षटकात सर्व गडी गमवून १४० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबईने ८ गडी गमवून ५२८ धावा केल्या आणि डाव घोषित केला. मुंबईकडे पहिल्या डावात ३८८ धावांची आघाडी होती. ही आघाडी मोडून काढणे आणि विजयासाठी मुंबईला धावा देणे काही हिमाचल प्रदेशला जमले नाही. ते दुसऱ्या डावात सर्व गडी गमवून २९१ धावांपर्यंत मजल मारू शकले.

मुंबईसाठी पहिल्या डावात सरफराज खानने १५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर तुषार देशपांडेने भेदक गोलंदाजी केली. त्याने १३.५ षटकात ४६ धावा देत चार विकेट घेतल्या. सिल्व्हेस्टर डिसोजाने दोन आणि मोहित अवस्थी आणि तनुष कोटियनने प्रत्येकी एक गडी बाद केला.

दुसऱ्या डावात मोहित अवस्थीने पाच, तुषार देशपांडे आणि शम्स मुलानीने दोन, तर सिल्व्हेस्टर डिसोजाने एक विकेट काढली.

# आशियाई पॅरा गेम्समध्ये दीप्ती जीवनजीला 'सुवर्ण'

**टोकियो** : जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताची पॅरा-अॅथलिट दीप्ती जीवनजी हिने सुवर्णपदक जिंकत नवा इतिहास रचला आहे.

महिलांच्या ४०० मीटर टी-२० प्रकारात भारताच्या दीप्ती जीवनजीने सुवर्णपदकाला गवसणी घातली. तिने ५६.३६ सेकंदांची विक्रमी वेळ नोंदवत नवीन 'गेम्स रेकॉर्ड' आपल्या नावावर केला. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या दीप्तीने या शर्यतीत सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखले आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले.

# डब्ल्यूपीएलसाठी २८ ऑक्टोबरला लिलाव

**मुंबई** : वुमन्स प्रीमियर लीग २०२७ स्पर्धा जानेवारीत होणार आहे. या स्पर्धेचे हे पाचवे पर्व असून पाचही संघ या स्पर्धेसाठी मोर्चेबांधणी करत आहेत. या स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव कोची येथे पार पडणार आहे. ही लिलाव प्रक्रिया २८ ऑक्टोबरला होणार आहे.

या लिलावात भारतीय फलंदाज जी कमलिनी, अष्टपैलू स्नेह राणा, ऑस्ट्रेलियाची कर्णधार सफी मोलिन्यू आणि श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टू यांच्यासह १४६ खेळाडूंवर बोली लागणार आहे, पण पाचही फ्रेंचायझींच्या मिळून २७ जागा शिल्लक आहेत. म्हणजेच १४६ पैकी फक्त २७ जणींचे नशिब चमकणार आहे.

लिलाव प्रक्रियेतील १४६ पैकी ११९ खेळाडू हे भारतीय आहेत. यात २२ कॅप्ड आणि ९७ अनकॅप्ड खेळाडू आहेत, तर २७ विदेशी खेळाडू आहेत. यात असोसिएट देशांचे सहा खेळाडू आहेत. या यादीत १४ कॅप्ड आणि १३ अनकॅप्ड खेळाडू आहेत. शिल्लक २७पैकी २० जागा या भारतीय खेळाडूंसाठी आहेत, तर विदेशी खेळाडूंसाठी सात जागा आहेत.

# गोळाफेकमध्ये तिन्ही पदके भारताला!

## सांगलीकर सचिन खिलारीची 'सुवर्ण' कामगिरी

**आयची नागोया : वृत्तसंस्था**



आशियाई पॅरा गेम्स स्पर्धेतील पुरुषांच्या एफ ४६ गोळाफेक प्रकारात भारतीय खेळाडूंनी मोठा पराक्रम करून दाखवला आहे. या स्पर्धेतील तिन्ही पदके भारताने जिंकली आहेत. सांगलीकर सचिन सर्जेराव खिलारीने आशियाई क्रीडा स्पर्धेत विक्रम रचत सुवर्णपदक पटकावले. मोहम्मद यासिरने रौप्य, तर परवीनने कांस्यपदक जिंकले.

सचिन खिलारीने आपल्या सहाव्या आणि अंतिम प्रयत्नात १५.८७ मीटर अंतरावर गोळा फेकत पहिले स्थान मिळवले. यासह त्याने या स्पर्धेतील जुना विक्रम मोडला. यापूर्वी हा विक्रम १५.६७ मीटरचा होता. सचिनची ही कामगिरी आणखी खास ठरली, कारण त्याने मागील स्पर्धेत जिंकलेल्या सुवर्णपदकाचा यशस्वीपणे बचाव केला.

या स्पर्धेत भारताच्या मोहम्मद यासिरनेही शानदार कामगिरी केली. त्याने तिसऱ्या प्रयत्नात १५.०६ मीटर अंतरावर गोळा फेकत रौप्यपदकावर नाव कोरले. तर परवीनने १४.९४ मीटर अंतरावर गोळा फेकत कांस्यपदक पटकावले. अशा प्रकारे भारतीय खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य अशी तिन्ही पदके जिंकून स्पर्धेवर आपले वर्चस्व सिद्ध केले.

सचिन खिलारी हा सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील करगणी या छोट्याशा गावातून पुढे आलेला खेळाडू आहे. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये रौप्यपदक पटकावल्यानंतर भारत सरकारने त्याला अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित केले आहे. बालपणी झालेल्या अपघातामुळे आलेल्या दिव्यांगत्वावर मात करत सचिनने पॅरा अॅथलेटिक्समध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली. गोळाफेकमध्ये सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी करत तो देशाची मान अभिमानाने उंचावत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com